# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०४/ २०१५** **दिनांक १६.०४.२०१५**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १५.०४.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २२५/ २०१५, दिनांक १३/०४/२०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २६४/ २०१५, दिनांक १६/०४/२०१५ रोजीचे पत्राने सदरहू सभा बुधवार दिनांक १५/०४/२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता ऐवजी गुरुवार दिनांक १६/०४/२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता आयोजित करणेत आली असून सभेची विषयसूची (अजेंडा) पुर्वीप्रमाणेच राहील असे सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक १६.०४.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १२.०३.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०४** दिनांक १२.०३.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक १८.०३.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

---

**विषय नं.०३** **दिनांक ०८.०४.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

---

**विषय नं.०४** **जमाखर्च तक्ता माहे, जानेवारी- २०१५.**

माहे, जानेवारी- २०१५ मधील जमा रु.४२,३६,३८,२७१/- तसेच खर्च रु.१७,३१,९४,५२५/- मात्र तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.१०७** **माहे, जानेवारी- २०१५ जमाखर्च तक्त्यावर सविस्तर चर्चा होऊन, त्याची नोंद घेण्यात आली व त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०५** **मुख्य लेखाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्याबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्य लेखाधिकारी यांचे कामकाजाबाबत व्यवस्थापन समितीच्या दि.17/7/2014 च्या सभेपुढे सादर झालेला विषय व समितीचा निर्णय खालीलप्रमाणे आहे.

आयत्या वेळेचा विषय नं.**05 -** मुख्य लेखाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्याबाबत.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे आर्थिक बाबींशी निगडीत कामकाज पाहण्यासाठी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील वर्ग-1 चे पद शासनाने प्रतिनियुक्तीने नेमलेले आहे. सदयस्थितीमध्ये मुख्य लेखाधिकारी यांचेकडे असलेल्या कामकाजाची पध्दती ठरवून दिलेली नाही. सदयस्थितीमध्ये लेखाशाखा विभाग प्रमुख म्हणून मुख्य लेखाधिकारी हे कामकाज पाहत आहेत. सध्याच्या पध्दतीमध्ये सुसूत्रता नाही. मुख्य लेखाधिकारी हे पद महाराष्ट्र व लेखा संवर्गातील वर्ग-1 चे पद असून सदरील पदाचे कामकाज शासकीय विभागात पूर्व लेखापरिक्षण, अंतर्गत लेखापरीक्षण, वैधानिक लेखापरीक्षण, वित्तीय सल्लागार अशा स्वरुपाचे असते. त्याचा अहवाल नियंत्रण अधिका-याला/मुख्य कार्यकारी अधिकारी/आयुक्त/उपायुक्त यांना सादर होत असतो. परंतु सदयस्थितीत संस्थानमध्ये मुख्य लेखाधिका-याचे अहवाल व नस्त्या थेट कार्यकारी अधिका-याकडे/उप-कार्यकारी अधिकारी यांचेकडे न जाता प्रशासकीय अधिका-यामार्फत जातात. प्रशासकीय अधिका-याच्या नियंत्रणात असलेल्या विभागांचे पूर्व लेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल व नस्त्याचे लेखापरीक्षण पुन्हा प्रशासकीय अधिका-यामार्फत सादर होणे ही बाब प्रशासकीय दृष्टीने योग्य वाटत नाही. यास्तव खालीलप्रमाणे कार्यपध्दती असावी.

देयकांचे व नस्त्यांचे लेखापरीक्षण आणि अंतर्गत लेखापरीक्षण निष्पक्षपणे व्हावे यासाठी मुख्य लेखाधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य वित्त व लेखाधिकारी यांचेप्रमाणे स्वतंत्र दर्जा देऊन त्यांच्या नियंत्रणात रुग्णालयाचा वित्त विभाग, लेखाशाखा व अंतर्गत लेखापरीक्षण देऊन सदरील पदनाम मुख्य लेखा व वित्त अधिकारी असे करण्यात येत

आहे. सदरील पद कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणात काम करीत व सर्व प्रशासकीय अधिकारी आपल्या विभागाच्या नस्त्या वित्तीय अभिप्रायासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे सादर करतील. तसेच संस्थानच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषद मुख्य वित्त व लेखाधिकारीप्रमाणे सर्व लेख्यावर नियंत्रण, वित्तीय व्यवस्थापन व गुंतवणूका, वित्तीय सल्लागार, अर्थसंकल्प, देयकांचे व नस्त्यांचे प्राथमिक लेखापरिक्षण, अंतर्गत लेखापरिक्षण, मध्यवर्ती भांडार तपासणी, निविदा पध्दती व स्विकृती नस्त्यावरील अभिप्राय तसेच व्यवस्थापन समितीच्या व बैठकीस उपस्थित राहून अध्यक्षांनी/कार्यकारी अधिकारी यांनी विचारल्यास योग्य तो सल्ला देणे इ.कामकाज पाहतील.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या नियंत्रणातील शाखा पुढीलप्रमाणे असतील.

1) लेखाशाखा विभाग (त्यांचे प्रमुख सध्या लेखाशाखेकडे असलेले लेखाधिकारी हे असतील)

2) अंतर्गत लेखापरिक्षण विभाग (त्यांचे प्रमुख सध्या लेखाशाखेकडे असलेले दुसरे लेखाधिकारी हे असतील)

3) रुग्णालयातील वित्त विभाग :- (त्यांचे प्रमुख रुग्णालयाचे वित्त व्यवस्थापक हे असतील)

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली वरील तिनही शाखा राहातील तसेच रुग्णालयातील आर्थिक बाबींशी निगडीत सर्व नस्त्या वैदयकीय संचालक यांच्या स्वाक्षरीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे सादर होतील.

निर्णयासाठी सादर.

निर्णय क्रं.**609** यावर सविस्तर चर्चा होऊन**,** उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

व्यवस्थापन समितीने घेतलेल्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने आस्थापना शाखेने याबाबतचे अनुषंगिक आदेश काढणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी याबाबत कार्यकारी अधिकारी यांचेकडे कुठलाही प्रस्ताव सादर केलेला नव्हता.

दरम्यान सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी दि.6/3/2015 रोजीचे अर्जान्वये मा.अध्यक्ष महोदयांकडे जी तक्रार सादर केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्दे आहेत.

1) मुख्य लेखाधिकारी हे पद विभागप्रमुखाचे संवर्गामध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

2) लेखाधिकारी या पदनामाऐवजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी अशा पदनामात बदल करणेबाबतचा प्रस्ताव चुकीचा व दिशाभूल करणारा आहे.

3) अशाप्रकारे पदनामात बदल शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय करता येणार नाही.

4) पूर्वीच्या प्रथेप्रमाणे मुख्य लेखा अधिकारी यांनी आपले प्रस्ताव थेट सादर न करता त्या त्या संबंधित प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत सादर करावेत.

मुख्य लेखाधिकारी यांची वेतनश्रेणी व प्रशासकीय अधिकारी यांची वेतनश्रेणी (15600-39100 ग्रेड पे 5400) समान आहे. यावरुन मुख्य लेखाधिकारी हे प्रशासकीय अधिकारी यांना sub-ordinate निश्चितच नाही.

सर्वसाधारणपणे शासन अंगीकृत आस्थापनामध्ये लेखाधिकारी यांची नियुक्ती ही शासनाकडून त्यांचे आस्थापनेवरील अधिका-यांमधून केली जाते. यामध्ये लेखाधिकारी यांचेकडून अपेक्षित असलेले त्या आस्थापनेतील विविध विभागांचे लेखापरीक्षण इ.कामकाज हे स्वतंत्रपणे करणे असे अभिप्रेत आहे. यामध्ये एखादया विभागाच्या कामकाजातील लेखाविषयक त्रुटी ज्या अधिका-यांच्या अंतर्गत घडल्या आहेत, त्याविरुध्द त्याच अधिका-याकडे सादर करणे इष्ट नाही, ही सर्वसाधारण कार्यपध्दती आहे.

म्हणूनच तर या पदावरील अधिकारी हा संस्थान कर्मचा-यांमधून नियुक्त केलेला नसून तो स्वतंत्रपणे शासनाकडून नेमण्याची कार्यपध्दती आहे हे या बाबीची पुष्टी करते. त्यामुळे व्यवस्थापन समितीने यापूर्वी या प्रकरणी घेतलेला निर्णय चुकीचा आहे असे प्रशासकीय अधिकारी यांचे म्हणणे आक्षेपार्ह आहे. तसेच तो प्रस्ताव व्यवस्थापन समितीला परस्पर सादर झाला होता हे म्हणणे देखील चुकीचे आहे, कारण व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केले जाणारे सर्व प्रस्ताव हे कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीनेच सादर केले जातात.

व्यवस्थापन समितीचा सदरचा निर्णय सध्याच्या कार्यकारी अधिका-याच्या कार्यकाळात झालेला नाही व वरीलप्रमाणे निर्णयाची अंमलबजावणी अदयापपर्यंत झालेली नाही. त्यामुळे मुख्य लेखाधिकारी या पदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी असे नामकरण झालेले नाही. असे नामकरण शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय करता येणार नाही याबाबत दुमत असण्याचे कारण नाही.

शासननियुक्त मुख्य लेखाधिकारी पदाच्या कामकाजाबाबतची निश्चित वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी आवश्यकता भासल्यास शासनाचे याप्रकरणी मार्गदर्शन घेता येईल असे वाटते.

सध्या संस्थानकडे तहसीलदार संवर्गातून नेमणूक असलेल्या उपकार्यकारी अधिकारी यांची वेतनश्रेणी 6 व्या वेतन आयोगाप्रमाणे रु.15,300-39,100 ग्रेड पे 5000 अशी आहे, सदरची वेतनश्रेणी प्रशासकीय अधिकारी तसेच मुख्य लेखाधिकारी यांचेपेक्षा कमी असली तरी त्यांची नेमणूक शासनाकडून झालेली असल्यामुळे मुख्य लेखाधिकारी यांचेकडील सर्व प्रस्ताव उप कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत सादर केले जातात.

तरी समितीने या सर्व बाबी विचारात घेऊन याप्रकरणी उचित निर्णय घ्यावा असे सुचविण्यात येत आहे.

**निर्णय क्र.१०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अर्जदार प्रशासकीय अधिका-यांना पुढील त्रीसदस्य समिती सभेसमोर त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी प्रत्यक्ष बोलाविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०६** **जलयुक्त शिवार अभियान राबविण्यासाठी राज्यातील शिर्डी, श्रीसिध्दीविनायक देवस्थानकडून देणगीव्दारे प्रत्येक जिल्हयास किमान रु.१ कोटी मदत करण्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

**प्रस्ताव-** (अ (प्रस्तावीत मागणी-:

मा.श्री.वी.ग्या.बिष्टा,विधि सल्लागार-नि-सह सचिव, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई क्रमांक संकीर्ण-2015/82/प्र.क्र.25/ का.सोळा, मंत्रालय मुंबई, दि.05 मार्च,2015 चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

महाराष्ट्र राज्यात पिकाच्या ऐन वाढीच्या काळात पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे सातत्याने टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होऊन पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत व पीक उत्पादनावर मोठा परिणाम होत आहे . शाश्वत शेती व पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी जल संधारण अंतर्गत एकात्मिक पध्दतीने सर्व विभागाच्या समन्वयाने नियोजनबध्द आराखडा तयार करुन टंचाई परिस्थितीवर कायम स्वरुपी मात करण्यासाठी राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे .या अभियानामध्ये शासकीय विभाग, स्वंयमसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उद्यो्जकांचा सहभाग अंतर्भूत आहे .या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी 5000 गावे टंचाई मुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे .

2.जलयुक्त शिवार अभियान या उपक्रमासाठी सन 2015-2016 करीता निवडण्यात आलेल्या 5000 गावांमधील पाण्याचा ताळेबंद, कृती आराखडा करण्याची कार्यवाही झालेली असून सदर कामे जून 2015 पूर्वी करावयाची आहे.त्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने सदर उपक्रमाकरीता देणगीव्दारे CSR , अशासकीय संस्था, लोकसहभाग तसेच राज्यातील देवस्थाने यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे .त्यानुसार श्री साईबाबा संस्थान, शिर्डी व

श्री सिध्दीविनायक गणपती मंदिर न्यास, मुंबई यांच्याकडून प्रत्येक जिल्हयास किमान रु.1 कोटी अपेक्षित असून त्यानुषंगाने अर्थ सहाय्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आहेत .

3.तरी शासन निर्देशानुसार आपणांस कळविण्यात येते की,जलयुक्त शिवार अभियान राबविण्यासाठी आपल्या देवास्थानकडुन देणगीव्दारे प्रत्येक जिल्हयास किमान रू.1 कोटी मदत करण्याचा प्रस्ताव अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

अधिनियमातील तरतूद-:कलम 17(2)(ण(मध्ये अशी तरतुद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 चे कलम 17 मधील) 2)(ण (, छाननी समितीच्या शिफारसीनूसार व राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने च् मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल .करणेची तरतुद आहे.छ

(ब (उपरोक्त शासन पत्रास अनुसरून सविस्तर टिपणी अशी की,दि.13.03.2012 चे मा.उच्च न्यायालय ,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार सध्या संस्थान दैनदिन व्यवस्थापनाचे कामकाज मा.त्रिसदस्य समिती बघत आहे.या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांनी दि-13.03.2012 रोजी आदेशात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्देश-:

दि13.03.2012 चे मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपी औरंगाबाद यांचे PIL No.18/2011, date 13 March 2012 Sr.No.18 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत .च्The existing Committee and the Committee constituted by this Court is directed not to take any major financial decision in respect of management of the affairs of the Sansthan without intimating this Court.छ

तसेच CIVIL APPLICATION NO. 12056/2012 IN PIL NO.18/2011,date 16 Oct.2012 Sr.No. 6 (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature.

(क (उपरोक्त परिच्छेद अ व ब मधील तपशीलाचा विचार करता जलयुक्त शिवार अभियान राबविण्यासाठी राज्यातील शिर्डी, श्रीसिध्दीविनायक देवस्थानकडून देणगी व्दारे प्रत्येक जिल्हयास किमान रु.1 कोटी निधी आर्थिक सहायता मिळण्याबाबत प्रस्ताव अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा, असे कळविले आहे . सध्या महाराष्ट्रात एकुण 36 जिल्हे असुन, ,(मुंबई व मुंबई उपनगर (हे दोन्ही जिल्हे वगळुन एकुण 34 जिल्हे या प्रमाणे एकुण रूपये 34 कोटी इतका निधी उपलब्ध करून दयावा लागेल.

सदरचा प्रस्ताव शासनाकडून प्राप्त झालेला असल्याने शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही . सदरच्या प्रस्तावास मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेऊन कार्यवाही करता येईल .

तरी प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, जलयुक्त शिवार अभियान राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनास एकूण रु.३४ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन देणेस तत्वत: मान्यता देण्यात आली .**

**मात्र सदरहू निधी शासनास देणेअगोदर मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ तसेच अधिनियम-२००४ मधील तरतूदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०७** **श्री पुण्यतिथी उत्सव– २०१४ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री पुण्यतिथी उत्सव-२०१४ मधील खर्चाकरीता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२८/०८/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ६९८ अन्वये एकुण ५३,८२,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

श्री पुण्यतीथी उत्सव -२०१४ साठी प्रत्यक्षात खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.नं | तपशील | अंदाज पत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंडप, कमानी स्टेज उभारणे खर्च | ७३५०००.०० | ५२८५८१.०० | ०.०० | २०६४१९.०० |
| ०२ | कलाकार कीर्तनकारासह बिदागी | २५८०५३.०० | १४४५६.०० | ०.०० | २४३५९७.०० |
| ०३ | मिष्टान्न खर्च – मजूरीसह, फर्निचर भाडेसह खर्च | १४३९००२.०० | ५३०३०१.०० | ०.०० | ९०८७०१.०० |
| ०४ | विदयुत, रोषणाई, जनसेट भाडे, इंधन खर्च इ. | १०००००.०० | ८८२८४२.०० | ०.०० | ११७१५८.०० |
| ०५ | निमंत्रण पत्रिका, पोष्टेज, स्टीकर, उदीप्रसाद भरणे मजुरी खर्च, फलेक्स बोर्ड बॅनर खर्च | १५२५०००.०० | १३१०८५८.०० | ०.०० | २१४१४२.०० |
| ०६ | इतर खर्च –प्रसाद, वस्तुचे भाडे, उत्सवासंबधी किरकोळ खर्च इ. | ५०९४५.०० | ३०००.०० | ०.०० | ४७९४५.०० |
| ०७ | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी) मानधन खर्च | ३५००००.०० | १०५१०६.०० | ०.०० | २४४८९४.०० |
| ०८ | पालख्यांचे पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च | २४०००.०० | १९७७५.०० | ०.०० | ४२२५.०० |
| ०९ | मंदीर व मंदीर परीसर फुलांचे सजावट खर्च | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकुण** | **५३,८२,०००.००** | **३३,९४,९१९.००** | **०.००** | **१९८७०८१.००** |

उपरोक्त तपशील पाहता श्री पुण्यतिथी उत्सव -२०१४ करीता रुपये ५३,८२,०००/- (रु. त्रेपन्न लाख ब्यांऐशी हजार) मात्र मंजूर करण्यात आलेली होती. या उत्सवासाठी प्रत्यक्षात एकूण रुपये ३३,९४,९१९/- (रु. तेहतीस लाख चौ-यांण्णव हजार नऊशे एकोणीस) मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे एकुण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.११०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव– २०१४ साठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यता आली.** (कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.०८** **शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता ज्युनियर केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ (RTE Act, 2009) अन्वये अधिन राहून प्रवेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक**– श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे वाढती विद्यार्थी संख्या व अपु-या वर्ग खोल्यामुळे शाळा दोन सत्रात भरविण्यात येत आहे. सकाळचे सत्रात ज्यु. केजी, सिनीयर केजी व इयत्ता ६ वी ते १० वी असे एकूण २१ वर्ग व दुपारचे सत्रात इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी चे एकूण २४ वर्ग चालविले जातात. ज्यु. केजी करीता प्रवेश देतांना मागील वर्षाप्रमाणे ५ तुकडया करुन अंदाजे २५० प्रवेश निश्चित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ज्यु. केजी वर्गासाठी किमान २५० प्रवेश द्यावे लागतील. शासनाचे आर.टी.ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा ) अन्वये 25 % प्रवेश देणे असल्याने मर्यादीत प्रवेश संख्या ठेवण्यात यावी. ही प्रवेश प्रक्रीया राबवितांना मागील वर्षाचे प्रवेश प्रक्रीया प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे नम्र मत आहे.

**मागणी** – शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमाबाबतची शालेय प्रवेश प्रक्रीया खालीलप्रमाणे जाहीर झालेली असून त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

**सन २०१५-१६ ज्यु .के.जी. प्रवेश प्रक्रिया तपशिलवार तक्ता**

| अ.न. | प्रक्रिया सन २०१५-१६ | तपशिल | वेळ |
|---|---|---|---|
| १ | दि. ६ मार्च २०१५ ते दि. २० मार्च २०१५ अखेर | प्रवेश अर्ज वाटप व अर्ज स्विकृती | सकाळी ११.०० ते १.०० व दुपारी ३.०० |
| २ | दि. २१ मार्च २०१५ ते दि. २५ मार्च २०१५ अखेर | प्राप्त अर्जाची छाननी, पात्र अपात्र ठरविणे | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | दि. २६ मार्च २०१५ ते<br>दि. ३१ मार्च २०१५ | पात्र ठरलेल्या अर्जांची सोडत (लकी ड्रॉ) काढून प्रवेश प्रक्रिया करणे. | ते ४.०० पर्यत |
| ४ | दि.०१. एप्रिल २०१५ ते<br>दि.०५ एप्रिल२०१५ अखेर | आर.टी.ई. कायदया नुसार प्रवेश दिलेल्या बालकांची यादी / प्रतिक्षा यादी जाहीर करणे. पालकांनी शालेय शुल्क व स्कुलबस शुल्क भरुन पाल्यांचा प्रवेश निश्चित करणे. | |
| ५ | दि.०६ एप्रिल २०१५ ते<br>दि.०८ एप्रिल२०१५ अखेर | शाळेकडून प्रवेशा बाबत अहवाल यादी शिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करणे. | |

**उपरोक्त प्रवेश प्रक्रीया राबवितांना खालील बाबींची विचार व्हावा.**

**१)** ज्यु. के.जी. व सिनियर केजी वर्ग दुपारचे सत्रात म्हणजे दुपारी १२.३० ते ३.०० यावेळेत भरविण्यात यावे जेणे करुन स्कुलबसचे नियोजन करण्यास सोयीस्कर होईल.

**२)** सन २०१५- २०१६ शैक्षणिक वर्षात मागील वर्षाप्रमाणे केवळ २५० विद्यार्थ्यांना प्रवेश देवून फक्त ५ तुकडया करण्यात याव्यात. ज्यु.के.जी. साठी फक्त २५० फॉर्मची विक्री करण्यात यावी, फक्त २५० विदयार्थ्यांना प्रवेश अर्ज देण्यात यावेत व दिलेल्या मुदतीतच ज्यु. के.जी. प्रवेशासाठी फॉर्म विक्री करण्यात यावी. मुदत संपलेनंतर प्रवेशासाठीच्या फॉर्मची विक्री करण्यात येवू नयेत,यामुळे व्यवस्थापनात ब-याच अडचणी निमार्ण होतात.

**३)** दि.३१ मे २०१५ अखेर पाल्यांचे वय ३.३ ते ४.३ या वयोगटापर्यत असावे, म्हणजे जन्मतारीख ( फेब्रुवारी २०११ ते फेब्रुवारी २०१२) या कालावधीतील असावी. मागील वर्षीही अशाच वयोगटातील पाल्यांना प्रवेश देण्यात आला होता.

**४)** ज्या पालकांचे पाल्यांचे वय ३.३ ते ४.३ वयोगटात बसत असेल फक्त अशाच पालकांना प्रवेश देण्यात यावेत इतरांना प्रवेश अर्ज विक्री करण्यात येवू नयेत, जणेकरुन प्रशासनावर पालकांचा रोष राहणार नाही.

**५)** ज्यु. के.जी. साठी प्रवेश देतांना अनुक्रमे प्राधान्य संस्थान कायम कर्मचारी पाल्य / कंत्राटी कर्मचारी पाल्य व त्यानंतर शिरडी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी (शाळेपासून ३ कि.मी. अंतरावर असलेले रहिवाशी ) फक्त यांनाच प्रवेश देण्यात यावा. या व्यतिरिक्त प्रवेश अर्ज वाटप करण्यात येवू नयेत.

**६)** प्रवेश अर्ज देतेवेळी विदयार्थ्यांचा मूळ जन्म दाखला (ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका) यांनी प्रमाणित केलेला, तसेच शिरडी गावातील रहिवासी दाखला/ रेशनकार्ड/ मतदान कार्ड/ आधारकार्ड/ लाईटबील तपासून अशाच पालकांना पाल्यांचे प्रवेशासाठी प्रवेश अर्ज देण्यात यावा .

**७)** प्रवेश निश्चित करतांना विदयार्थ्यांचे शैक्षणिक व स्कुलबस शुल्क एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेण्यात यावे जे पालक मुदतीचे आत शुल्क भरणार नाहीत त्यांचे पाल्यांचा प्रवेश रद्द करण्यात यावा.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमाबाबतची शालेय प्रवेश प्रक्रिया जाहीर झालेली असून त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे अन्यथा शासनाच्या स्कुल मान्यतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**– ज्यु. के.जी. साठी प्रवेश प्रक्रिया राबवितांना मर्यादीत २५० प्रवेश दिले तर आजमितीस तूर्त तरी वर्ग खोल्या अपु-या पडणार नाहीत,तसेच उपरोक्त नियमावलीतील आवश्यक माहीती पालकांना माहीत व्हावी यासाठी शाळेच्या प्रवेशव्दारावर प्रवेश प्रक्रिया वेळापत्रकाचा डिजिटल बोर्ड तयार करुन लावता येईल. तरी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता ज्युनियर के.जी. या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, 2009) च्या अधिन राहून प्रस्तावित केलेप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकामधील कालावधी उलटून गेलेला असल्याने, कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्रवेश प्रक्रियेचे नवीन वेळापत्रक तयार करणेत येऊन, पालकांच्या माहितीसाठी ते शाळेच्या प्रवेशद्वारावर लावणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.९** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डी शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ करीता वर्ग खोल्या अपु-या पडत असल्याने वर्ग खोल्या नियोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक**– श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे एकूण ३४ वर्ग खोल्या उपल्ब्ध असून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ज्यु. केजी. ते इयत्ता १० वी पर्यंत एकूण ४८ तुकडया कार्यरत होत आहेत. अपु-या वर्गखोल्यामुळे शालेय कामकाज दोन सत्रात चालविण्यात येत असून सकाळचे सत्रात ज्यु. केजी व सिनियार केजी शालेय वेळ सकाळी ०८.०० ते १०.३० इयत्ता ६ वी ते १० वी शालेय वेळ सकाळी ०८.०० ते ०१.०० अशी भरविण्यात येते. या सत्रात एकूण २१ वर्गचालविले जातात. दुपारचे सत्रात शालेय वेळ १२.०० ते ०५.०० इयत्ता १ ली ते ५ वी चे एकूण २४ वर्ग

भरविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ज्यु. केजी वर्गाची प्रवेश प्रक्रीया करणे बाकी असून मागील वर्षापमाणे किमान ५ तुकडया करुन २५० विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागेल. किमान २५० प्रवेश निश्चित होण्याची शक्यता आहे.
**मागणी:-** अपु-या वर्ग खोल्यामुळे खालीलप्रमाणे नियोजन करण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

**इमारतीतील एकूण वर्ग तुकडी व उपलब्ध वर्ग खोल्या तपशिलवार तक्ता.**

| **सन २०१४- १५ सद्यस्थिती** | | | **सन २०१५-१६ संभाव्य स्थिती** | | |
|---|---|---|---|---|---|
| सकाळ सत्र शालेय वेळ सकाळी ०८.०० ते ०१.०० | | | सकाळ सत्र शालेय वेळ सकाळी ०७.१५ ते १२.१५ | | |
| सध्याचे वर्ग | तुकडी | उपलब्ध वर्ग खोल्या | पुढील वर्ष वर्ग | तुकडी | आवश्यक वर्ग खोल्या |
| ज्यु. व सि. केजी | १० | १० | इयत्ता ५ वी | ३ | ३ |
| इयत्ता ६ वी | ३ | ३ | इयत्ता ६ वी | ४ | ४ |
| इयत्ता ७ वी | २ | २ | इयत्ता ७ वी | ३ | ३ |
| इयत्ता ८ वी | २ | २ | इयत्ता ८ वी | २ | २ |
| इयत्ता ९ वी | २ | २ | इयत्ता ९ वी | २ | २ |
| इयत्ता १० वी | २ | २ | इयत्ता १० वी | २ | २ |
| एकूण | २१ | २१ | एकूण | १६ | १६ |
| **दुपार सत्र शालेय वेळ सकाळी १२.०० ते ०५.००** | | | **दुपार सत्र शालेय वेळ सकाळी १२.३० ते ०५.३०** | | |
| इयत्ता १ ली | ५ | ५ | ज्यु. व सि. केजी | १० | १० |
| इयत्ता २ री | ६ | ६ | इयत्ता १ ली | ५ | ५ |
| इयत्ता ३ री | ६ | ६ | इयत्ता २ री | ५ | ५ |
| इयत्ता ४ थी | ३ | ३ | इयत्ता ३ री | ६ | ६ |
| इयत्ता ५ वी | ४ | ४ | इयत्ता ४ थी | ६ | ६ |
| एकूण | २४ | २४ | | ३२ | ३२ |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी /शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– शासनाची आर.टी.ई. २००९ अधिनियमाबाबतची शालेय प्रवेश प्रक्रिया जाहीर झालेली असून त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे अन्यथा शासनाच्या स्कुल मान्यतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल.
**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**–

१. इंग्लिश मिडीयम स्कुलच्या सन २०१५-१६ मध्ये एकूण ४८ वर्ग तुकडी कार्यान्वीत होत असून फक्त ३४ वर्ग खोल्या उपलब्ध आहेत. इंग्लिश मिडीयम स्कुलकरीता वर्ग खोल्या अपु-या पडत असल्याने श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर एकूण १२ वर्ग तुकडी सकाळचे अथवा दुपारचे सत्रात भरविण्यात आले तर कन्या विद्या मंदीरचे एकूण १४ खोल्या इंग्लिश मिडीयम स्कुलचे वापरात आणता येतील.
२. शैक्षणिक संकुलाकडील वापरात असलेल्या कन्या विद्या मंदीर व इंग्लिश मिडीयम स्कुल चे सर्व इमारतीचे वरील भागात तातडीने १ मजल्याचे बांधकाम करुन जवळपास १६ वर्ग खोल्या बांधून वर्ग खोल्याचा प्रश्न सुटू शकतो. परंतू हे बांधकाम तातडीने होणे आवश्यक आहे. यामुळे इंग्लिश मिडीयम स्कुल किमान ३ वर्षासाठी ज्यु. केजी ते इयत्ता १० वी पर्यंत एका सत्रात भरविता येईल व स्कुलबसेसच्या दिवसभरात दोन फे-या होवून मोठया प्रमाणावर इंधन खर्च वाचू शकतो.
३. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील सध्याचे ठिकाणी एकूण ३४ वर्गखोल्या उपलब्ध असून सकाळचे सत्रात इयता ५ वी ते १० वी शालेय वेळ सकाळी०७.०० ते १२.१५ अशी करुन एका सत्रात एकूण १६ वर्ग भरविण्यास तसेच दुपारचे सत्रात ज्युनियर व सिनीयर केजी १० वर्ग शालेय वेळ दुपारी १२.३० ते ०३.०० पर्यंत व इयत्ता १ ली ते ४ थी एकूण २२ वर्ग शालेय वेळ दुपारी १२.३० ते सायं.०५.३० पर्यंत भरविण्यास मान्यता मिळावी.

तरी उपरोक्त अभिप्राय विचारात घेता शालेय नियोजन सोयीचे व्हावे यासाठी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.११२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ करीता श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डीस वर्ग खोल्या अपु-या पडत असल्यामुळे शैक्षणिक संकुलाकडील वापरात असलेल्या कन्या विद्या मंदीर व इंग्लिश मिडीयम स्कुल इमारतीचे वरील भागात एक मजल्याचे बांधकाम होवू शकते काय, याबाबत तांत्रिक बाबी तपासून प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांचे युनिफॉर्म ड्रेस कोड बदलणेबाबत.**

**प्रस्ताव-** पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांचेकडील क्र. जिविशा/ 2229/2015 दि. 13/03/2015 रोजीचे पत्रान्वये (संदर्भ क्र. 5) मा. अध्यक्ष सो., यांना असे कळविले आहे की, दि. 20/11/2014 रोजी शिर्डी येथे मंदिर सुरक्षा संदर्भाने झालेल्या बैठकीच्या वेळी समक्ष झालेल्या सखोल चर्चेनुसार श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांचे युनिफॉर्म हे पोलिस ड्रेस कोड प्रमाणे असून ते बदलणे गरजेचे असलेबाबत सुचित करण्यात आलेले होते.

त्याप्रमाणे आपणास यापूर्वी कळविण्यात आलेले आहे. परंतु, शिर्डी संस्थानकडून अद्याप पावेतो कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. तरी याबाबत तात्काळ कार्यवाही करणेत यावी. सदरचे पत्र मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेमध्ये सादर करणेबाबत मा. अध्यक्ष सा ो., यांनी निर्देश दिलेले आहे. सदरचे पत्र इकडील कार्यालयाकडे दि. 02/04/2015 रोजी प्राप्त झालेले आहे.

संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांचे ड्रेस कोड बदलेबाबत यापूर्वी पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी त्यांचेकडील क्र. जिविशा/12015/2014 दि. 29/12/2014 व दि.नसलेले क्र. जिविशा/780/2015 रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

त्यास अनुसरुन, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना इकडील जा.नं. 6498/2015 दि. 31/03/2015 अन्वये असे कळविण्यात आले आहे की, " मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. 26/02/2013 व 08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील सिव्हील अॅप्लीकेशन नं. 3684/2014 वरील दि.02/05/2014 रोजीचे आदेशानुसार संस्थान आस्थापनेवरील सर्व अधिकारी /कर्मचारी यांचे ड्रेसकरीता कापड पुरविणेकामी मे. राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स संगमनेर व मे. तुलशी एम्पोरियम, सोनई यांना दि. 24/01/2014 रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता. कार्यादेशप्रमाणे त्यांनी दि. 22/02/2014 रोजी कापड संस्थानला पुरविलेले आहे. त्यात सुरक्षा रक्षकांचे ड्रेसकरीता रु. 2,16,000/- किंमतीचे एकूण 900 मीटर खाकी कापड खरेदी करण्यात आलेले आहे. म्हणजेच आपले पत्र येणेपूर्वीच कापड खरेदीची संपूर्ण कार्यवाही पूर्ण झालेली असून संबंधीत कर्मचाऱ्यांची मापे घेऊन ड्रेस शिलाईचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांचे ड्रेस कोडमध्ये सध्या बदल करता येणार नाही. मात्र भविष्यात आपले उपरोक्त संदर्भीय पत्रांतील सुचनांचा मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णयांनुसार आवश्य विचार करण्यात येईल."

उपरोक्तप्रमाणे पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना यापुर्वी कळविण्यात आलेले आहे.

तरी, पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे क्र. जिविशा/ 2229/2015 दि. 13/03/2015 रोजीचे संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांचे ड्रेस कोड बदलणेबाबतचे पत्रावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.११३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सुरक्षितेच्या कारणास्तव व पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे पत्राचा विचार करता, संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांच्या युनिफॉर्मचा रंग बदलणेस मान्यता देण्यात आली. युनिफॉर्मसाठी खरेदी करणेत आलेले कापड परत करणेत यावे. जर पुरवठाधारक कापड परत घेत नसेल तर ते कापड विद्यार्थ्यांना किंवा मंदिर परिसराच्या सुरक्षिततेसाठी नियुक्त केलेल्या पोलिस कर्मचा-यांना अथवा इतर विधायक कार्यासाठी देणेबाबतचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा.**

**तसेच, संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांच्या युनिफॉर्मसाठी नेव्ही ब्ल्यु (Nevy Blue) रंगाचे आवश्यक कापड खरेदी करणेत यावे. त्यासाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं. ११ सौर शहरीकरण प्रकल्पाअंतर्गत अस्थापित करावयाच्या यंत्रणेच्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

केंद्र शासनाचे नवीन व नविकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवि दिल्ली यांचेमार्फत शिर्डी संस्थान व शिर्डी नगरपंचायतीकरीता संयुक्तीक सौर शहरीकरण प्रकल्प विकसित करणेकरीता निवड झालेली आहे.

प्रकल्पाचे सल्लागार मे.दाराशॉं अँड कं.प्रा.लि., मुंबई यांनी प्रकल्प अहवाल (Detailed Project Report ) तयार केलेला असून हा प्रकल्प अहवाल संस्थानकडे शिर्डी नगरपंचायतीकडून प्राप्त झाल्यानंतर संस्थानमार्फत सदरील प्रकल्प अहवाल महाराष्ट्र शासनाची सहकारी संस्था महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचेकडे दिनांक ०४-०३-२०१५ रोजी तपासणीकरीता सादर करण्यात आलेला आहे. याकामी केंद्र सरकारचे कन्सलटंट पॅनेल मधील अधिकृत प्रकल्प सल्लागार मे.दाराशॉं अँड कं.प्रा.लि., मुंबई यांना शिर्डी सौर शहरीकरण प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायतीने नेमलेले आहे.

महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण, पुणे यांनी हा प्रकल्प अहवाल (DPR) तपासला असून हा प्रकल्प अहवाल योग्य असल्याचे लेखी कळविले आहे.

**(अ).** सौर शहरीकरण प्रकल्प योजने अंतर्गत संस्थानचे विविध इमारतींवरील टेरेसवर सौर उष्णजल व सौर विद्युत सयंत्रे आस्थापित करुन यंत्रणेची उभारणी केली जाणार आहे. त्यापासून संस्थानला गरम पाणी व २२५ केडब्ल्यु इतकी वीज मिळणार आहे. सदरील सौर शक्तीवर आस्थापित करण्यात येणा-या यंत्रणेचे आयुष्य साधारण १५ वर्षे इतके असणार आहे.

सौर ऊर्जेव्दारे एकुण २२५ के.डब्ल्यु इतकी वीज निर्माण होणार असल्याने सदरील वीजेचा ८ तास वापर गृहीत धरल्यास एका दिवसात १८०० युनिट वापर होऊन दिवसास रु.१६,२००/- व एका महिन्याला (३०दिवसात) अंदाजे रक्कम रु.४,८६,०००/- इतकी वीजेच्या बीलात बचत होऊ शकणार आहे. वार्षिक (३६५ दिवसात) रु.५९,१३,०००/- इतकी बचत होऊ शकते.

**(ब).** याव्यतिरिक्त स्टाफ क्वॅार्टरकडे सौर उष्णजल सयंत्र उभारणे प्रस्तावित असून ६६ क्वॅाटर्स (साईनगर परीसर) + २४ क्वॅाटर्स (५०० रुम) + ९६ क्वॅाटर्स (नविन सेवाधाम) अशा एकुण १८६ क्वॅाटर्सकरीता ही सिस्टीम बसविण्यात येणार असून प्रत्येक क्वार्टरमागे १८६ x २ = ३७२ युनिटस् रोज वाचणार असून याकामी रु.३,३४८/- प्रति दिवशी बचत होऊ शकते. वार्षिक १२,२२,०२०/- इतकी बचत होऊन (अ) रु.५९,१३,०००/-+(ब) रु.१२,२२,०००/- मिळून रु. ७१,३५,०२०/- इतक्या रकमेची बचत होऊन या प्रकल्पाचे रकमेची ३ वर्षात पुर्ण परतफेड मिळू शकते.

सौर शहरीकरण प्रकल्पाअंतर्गत आस्थापित करावयाच्या यंत्रणेचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव व ठिकाण** | **क्षमता** | **कामाची एकुण किंमत** | **संस्थानने खर्च करावयाची रक्कम** (70%) | **केंद्र सरकारमार्फत मिळणारी रक्कम** (30%) |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | ४५ के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रणा, ठिकाण:- औद्योगिक प्रशिक्षण इमारत टेरेस | ४५ KW | रु. ४५,००,०००/- | रु. ३१,५०,०००/- | रु. १३,५०,०००/- |
| ०२) | ९० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रणा, ठिकाण:- इंग्लिश मेडीअम स्कुल इमारत टेरेस | ९० KW | रु. ९०,००,०००/- | रु. ६३,००,०००/- | रु. २७,००,०००/- |
| ०३) | २० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रणा, ठिकाण:- श्री साईबाबा हॅास्पीटल इमारत टेरेस | २० KW | रु. २०,००,०००/- | रु. १४,००,०००/- | रु. ०६,००,०००/- |
| ०४) | २० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रणा, ठिकाण:- श्री साईबाबा हॅास्पीटल इमारत टेरेस | २० KW | रु. २०,००,०००/- | रु. १४,००,०००/- | रु. ०६,००,०००/- |
| ०५) | ५० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रणा, ठिकाण :- श्री साईनाथ हॅास्पीटल (कॅन्टीन) इमारत टेरेस | ५० KW | रु. ५०,००,०००/- | रु. ३५,००,०००/- | रु. १५,००,०००/- |
| ०६) | सौर उष्णजल यंत्रणा, कॅपॅसिटी:-३०,००० लिटर्स/ दिवस, ठिकाण:- संस्थान कर्मचारी वसाहती | ३०००लिटर्स / Day | रु. ५२,५०,०००/- | रु. ३६,७५,०००/- | रु. १५,७५,०००/- |
| | | **एकुण :-** | **रु.२,७७,५०,०००/-** | **रु.१,९४,२५,०००/-** | **रु. ८३,२५,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे सौर शहरीकरण प्रकल्पाअंतर्गत आस्थापित करावयाच्या सौर यंत्रणा उभारणी करणेकामी अंदाजे एकुण रक्कम रु.२,७७,५०,०००/-इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी संस्थानला ७०% म्हणजे रक्कम रु.१,९४,२५,०००/- इतकी रक्कम खर्च करावी लागणार आहे. व ३०% रक्कम रु.८३,२५,०००/- इतकी केन्द्र सरकार मार्फत सबसीडी मिळणार आहे. याकामी प्रकल्प सल्लागार मे.दाराशॉं यांनी सादर केलेल्या DPR वर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची स्वाक्षरी घेऊन ती पुढील कार्यवाहीसाठी शिर्डी नगरपंचायतीकडे त्वरीत सादर करावा अन्यथा विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थानची असेल असे शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी कळविले आहे. तरी डी.पी.आर.वर मा.कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी होऊन तो पुढील कार्यवाहीसाठी शिर्डी नगरपंचायतीकडे त्वरीत पाठविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती. स्वाक्षरी झालेला डी.पी.आर शिर्डी नगरपंचायतीकडे पाठविल्यानंतर हा D.P.R. नगरपंचायतीमार्फत मेडा, पुणे यांना सादर केला जाईल व यानंतर मेडा मार्फत केन्द्र सरकारचे अपारंपारीक ऊर्जा मंत्रालयाकडे सादर करण्यात येईल. या D.P.R. ला केन्द्र सरकारच्या अपारंपारीक ऊर्जा मंत्रालयाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील टेंडर वगैरे प्रक्रिया मेडामार्फत केली जाणार आहे. तसेच येणा-या खर्चास मा.त्रीसदस्य समितीची व मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेसाठी साधारणत: ३ ते ४ महिन्याचा कालावधी जाणार असून या कालावधीत याबरोबरच मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचीही मान्यता घेता येईल. त्यासाठी प्रथम: डी.पी.आर.वर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची स्वाक्षरी होऊन तो शिर्डी नगरपंचायतीकडे सुपूर्त करणे गरजेचे आहे.

**निर्णय क्र.११४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौर शहरीकरण प्रकल्पाअंतर्गत आस्थापित करावयाच्या सौर यंत्रणा उभारणी करणेचा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं. १२** **कनकुरी साठवण तलाव कॅन्व्हान्स प्रुफींग (Geomembrance Sheet) करणेकामी प्राप्त ई-निविदांबाबत**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियम कलम 21 मधील पोट-कलम (1) च्या खंड (क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि. 12/04/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 285 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून, कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Fabrics) करणेकामीच्या प्रस्तावित कामांसाठी तसेच याकामी येणा-या अंदाजे रु. 10.65 कोटी मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येवून मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपिठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी असे ठरले."

२. मा.व्यवस्थापन समिती सभा दि. 20/11/2014 आयत्या वेळचा विषय नं. 01, निर्णय क्रं. 1019

मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.

(2) मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि. 12/04/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 285 अन्वये कनकुरी येथील साठवण तलावामध्ये Geomembrane Fabrics करणेकामीच्या प्रस्तावित कामांसाठी तसेच याकामी येणा-या अंदाजे

रु.10.65 कोटी मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येवून, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरलेले आहे.

येत्या उन्हाळयात गंभीर पाणी टंचाई निर्माणहोण्याची शक्यता आहे व गोदावरी उजव्या तट कालव्यातून पिण्याचे पाण्यासाठी किती आवर्तन मिळतील याबाबत निश्चिती झालेली नाही. त्यामुळे मा.खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर काम सुरु करणेस विलंब होवू नये, लगेचच कामांस सुरुवात करता यावी, याकरीता सदरहू कामी मा.खंडपीठाचे मान्यतेस अधिन राहून वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविण्यात याव्या व मा. खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतरच संबंधीताना कार्यादेश देण्यात यावा. तसेच सदर कामांमध्ये रफ शहाबादी फरशीचे काम समाविष्ट असून त्यामुळे काम पुर्ण होण्यास विलंब होणार असल्याने व ही बाब वगळल्यास खर्चातही बचत होणार आहे. याकरीता सदर बाब वगळून सुधारित एस्टिमेट तयार करावे व त्यानुसार निविदांची मागणी करण्यात यावी,असे ठरले.

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा आदेश:-**

सिव्हील ॲप्लिकेशन नं. 5818/2014, दि. 14/01/2015 रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

Head. Perused the resolution of the committee dated 12.04.2014. The applicant has already advertised the tender as per the resolution and has received bids. The applicant is now permitted to take further steps for steps for finalizing the contract. But, before awarding the contract, the petitioner shall take permission of the Court. This Civil Application is kept pending.

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. 20/11/2014 चे रोजीचे सभेतील निर्णयानुसार इकडील विभागामार्फत निविदा व ई-टेंडर नोटीस तसेच नव्याने किमान पात्रता निकष (Minimum Qualifying Criteria) तयार करुन, दि. 05/12/2014 चे टिपणी अन्वये, वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी सदर कामांसाठी खालीलप्रमाणे फक्त 02 निविदाधारकांनी ई-निविदा प्रक्रियेव्दारे निविदा अपलोड केलेल्या होत्या.

1. R.K.Sawant, Civil Contractor, Nashik.
2. M/s.Swastik Constructions, Kolhapur.

तथापि याकामी उपरोक्तप्रमाणे फक्त 02 ई-निविदा प्राप्त झालेल्या असल्याने, दि. 05 फेब्रुवारी, 2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये याकामी परत एकदा वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर फेर (Second Call) जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

दि. 04/03/2015 रोजी सकाळी 11:00 वाजता ई-निविदांचे लिफाफा क्रं.01 (Technical Bid) इकडील विभागाचे प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले. उपरोक्त पैकी खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या होत्या.

1. M/s.Swastik Constructions, Kolhapur.
2. Arihant Constuction, Pune.
3. M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur.
4. R.K.Sawant, Civil Contractor, Nashik.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ई-निविदांचे कागदपत्रांचा (तांत्रिक छाननी अहवाल) Technical Evaluation Report प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. इन्फ्रा प्लॅन इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांनी तयार केला. सल्लागार यांचे अभिप्रायानुसार उपरोक्त 04 पैकी खालील 02 ठेकेदार विहीत पुर्वपात्रता अटीनुसार पात्रताधारक असल्याचे आढळुन आले.

1. M/s.Swastik Constructions, Kolhapur.
2. M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur.

तरी उपरोक्त विषयांकित कामांसाठी फक्त दोन ठेकेदारविहीत किमान पूर्वपात्रतानिकषानुसार पात्र होत असल्याने, दि. 04 मार्च, 2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये याकामी परत एकदा वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर फेर (Third Call) जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरहू ई-निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 17/03/2015. |
| 2) | Tender document download start date: | 17/03/2015 from 11:00 Hrs. |
| 3) | Tender document download end date: | 24/03/2015 upto 17:00 Hrs. |
| 4) | Pre-bid meeting date: | 19/03/2015 at 11:00 Hrs. |
| 5) | Bid submission start date: | 20/03/2015 from 11:00 Hrs. |
| 6) | Bid submission closing date: | 24/03/2015 upto 17:00 Hrs. |
| 7) | Technical bid hard copy submission date: | 26/03/2015 upto 17:00 Hrs. |
| 8) | Bid opening date (Technical & Commercial): | 30/03/2015 at 11:00 Hrs. (If possible) |

वरील तपशिलानुसार कनकुरी येथील साठवण तलावामध्ये कॅन्व्हास प्रुफिंग (Geomembrane Fabric Sheet) टाकणे या कामांबाबत दि. 19/03/2015 रोजी 11:00 वाजता शिर्डी येथील संस्थानचे सभागृहात मा.प्रशासकिय अधिकारी यांचे उपस्थितीत प्री-बीड मिटींग घेण्यात आली. त्यावेळी उपस्थित असलेल्या इच्छुक ठेकेदारांनी निविदेतील अटी व शर्तीबाबत उपस्थित केलेल्या शंकांबाबत चर्चा करण्यात आली. त्यास अनुसरुन Common Set of Deviations इच्छुक ठेकेदारांचे माहितीसाठी ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

उपरोक्त कामी विहीत मुदतीत खालील 03 निविदाधारकांचे Envelope No.01 (Technical Bid) hard copies मध्ये प्राप्त झालेले आहेत.

| **Sr.No.** | Name of Contractor | Inward No | Date |
|---|---|---|---|
| 1) | R.K.Sawant, Civil Contractor, Nashik. | 024465 | 25/03/2015 |
| 2) | M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur. | 024482 | 26/03/2015 |
| 3) | M/s.Swastik Constructions, Kolhapur. | 024483 | 26/03/2015 |

उपरोक्त कामी 03 निविदाकर्ते यांचे सिलबंद लिफाफा क्रं. 01 (Technical Bid) इकडील विभागाकडे हार्ड कॉपीव्दारे प्राप्त झालेले आहेत. जा.नं.एसएसएसटी/आयटी/2886/2013, दि. 27/11/2013 चे परिपत्रकान्वये संस्थानमधील किमान रक्कम 10 लाख व 10 लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा प्रक्रिया लागू करणेबाबत निर्णय झालेला आहे. ई-निविदा उघडणेचा अधिकार संबंधीत विभागांचे प्रशासकिय अधिकारी यांना प्रधान करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त विषयांकित कामांसाठी (Third Call) ई-निविदा प्रक्रियेव्दारे अपलोड झालेल्या ई-निविदांचे Technical Bid मा.प्रशासकिय अधिकारी, पाणी पुरवठा विभाग यांचे समक्ष दि. 31/03/2015 रोजी सकाळी 11:00 वाजता उघडणेत आले तसेच तद् नंतर ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत करण्यात आली. त्यानुसार उपरोक्त तीनपैकी तीनही ठेकेदार पात्र होत असल्याने सदर ठेकेदारांचे लिफाफा क्रं. 02 Commercial Bid त्याच दिवशी दुपारी 02:00 वाजता मा.प्रशासकिय अधिकारी, पाणी पुरवठा विभाग यांचे समक्ष उघडणेत आले. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

Estimated Cost:- Rs 3,76,57,209/-

| **Sr.No.** | Bidder's Name | Quoted Percentage | Quoted Rate | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Laxmi Civil Engineering Services Pvt.Ltd, Kolhapur. | 45.00% Above | 5,46,02,953/- | L3 |
| 2 | M/s.Swastik Constructions, Kolhapur. | 43.30% Above | 5,39,62,780/- | L2 |
| 3 | R.K.Sawant, Civil Contractor, Nashik. | 6.56% Below | 3,51,86,896/- | L1 (lowest) |

तरी उपरोक्त तपशिलात नमुद केलेप्रमाणे ठेकेदार R.K.Sawant, Civil Contractor, Nashik यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. (6.56 Below for the estimated cost)

याकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं. 5818/2014, दि. 14/01/2015 रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे मा.कोर्टाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, संस्थानचे विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन तयार करुन मा.कोर्टाचे मान्यतेसाठी दाखल करुन मा.कोर्टाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देता येईल.

**निर्णय क्र.११५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव कॅन्व्हान्स प्रुफींग (Geomembrance Sheet) करणेकामी उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय क्र.१३** **सामान्य प्रशासन शाखा व इंग्लिश मिडीअम स्कूल करिता झेरॉक्स मशिन खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीचे दि.०४.०२.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.१४७ नुसार सध्या बंद असलेले मॉडेल नं.५६४५ चे झेरॉक्स मशिन बायबॅकसह कार्यालयीन कामासाठी नवीन दोन झेरॉक्स मशिन्स विहित पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदरच्या प्रस्तावास मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडून दि.०४.०७.२०१४ रोजी मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.१४.०८.२०१४ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.१४.०८.२०१४ ते दि.३०.०८.२०१४ दरम्यान ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर ई-निविदेतील ऑनलाईन तांत्रिक लिफाफे दि.०१.०९.२०१४ रोजी उघडले असता दोनच निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने किमान तीन निविदा असणे आवश्यक असल्यामुळे सदर खरेदीकामी फेर ई-निविदा मागणी करावयात असे ठरले.

खरेदी विभागामार्फत दि.०३.१२.२०१४ रोजीचे टिपणीनुसार फेर-ई निविदा मागविणेबाबत टिपणी सादर केली असता, मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सदर निविदेमध्ये साईबाबा इंग्लिश मिडीयम सकुल करिता खरेदी करावयाच्या झेरॉक्स मशिनचा समावेश करणेबाबत निर्देश दिलेले होते.

साईबाबा इंग्लिश मिडीयम सकुलकडून त्यांचेकडील झेरॉक्स मशिन खरेदीबाबतचा प्रस्ताव मागविण्यात आला. त्यांचे प्रस्तावानुसार मा.व्य.समितीचे दि.०९.१२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०४० नुसार झेरॉक्स मशिन खरेदी करणेसाठी विहित पद्धतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार खरेदी विभागामार्फत दि.१२.०१.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, दि.१२.०१.२०१५ ते दि.२७.०१.२०१५ चे दरम्यान फेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर ई-निविदेतील ऑनलाईन तांत्रिक लिफाफे दि.०५.०२.२०१५ रोजी उघडले असता सदर वेळीही दोनच निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने किमान तीन निविदा असणे आवश्यक असल्यामुळे सदर खरेदीकामी फेर ई-निविदा मागणी करावयात असे ठरले.

त्यानुसार खरेदी विभागाकडील दि.२४.०२.२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार दि.०९.०३.२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०९.०३.२०१५ ते दि.१९.०३.२०१५ अखेर तिस-या वेळेस ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर ई-निविदेतील ऑनलाईन तांत्रिक लिफाफे दि.२५.०३.२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी साहेब व मा.लेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. सदरवेळी तीन निविदाधारकांच्या निविदा ऑनलाईन प्राप्त झालेल्या आहेत. तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांचा तपशिल सोबतच्या तक्त्यात जोडलेला आहे. सोबतच्या तक्त्याचे अवलोकन करता तीन्ही निविदाधारकांनी मागणी केल्याप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. त्यामुळे तिन्ही निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविण्यात आल्या.

उपरोक्त तीन्ही निविदाधारकांच्या ई-निविदेतील व्यापारी लिफाफे दि.०६.०४.२०१५ रोजी सर्व मा.प्रशासकीय अधिकारी व तीन पैकी दोन निविदाधारकांच्या उपस्थित उघडण्यात आले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Item | Dimond | Kyocera Document Solution India Pvt.Ltd, | Om Sai Marketing, Aurangabad | Digital Office Solutions, Ahmednagar |
|---|---|---|---|---|---|
| | | | Kyocera Company | Xerox Company | Ricoh Company |
| | | | Rate per Unit (With All Taxes) | | |
| 1 | **XEROX MACHINE -** 95 CPM, A3 Size Copier, Printer, Scanner, 4 Tray, DADF, Duplex, (Branded) | 01 Nos. | 9,03,000/- | 12,07,500/- | 9,24,000/- |
| 2 | **XEROX MACHINE -** 45 CPM, A3 Size Copier, Printer, Scanner, 4 Tray, DADF, Duplex, (Branded) | 01 Nos. | 3,34,635/- | 4,20,000/- | 3,51,750/- |
| 3 | **XEROX MACHINE -** Digital Copier with Printer (Size A5-A3) Printing Speed - 20CPM, Zoom -50-200%, Duplex inbuilt, 600dpi Resolution, Paper Tray Capacity - 250 X 1 Sheets Tray, 500 X 1 Sheets, 100 Sheet Bypass, RAM 128 MB, Colour Scanner (Branded) | 01 Nos. | 83,055/- | 1,27,050/- | 48,300/- |
| | | **Total** | 13,20,690/- | 17,54,550/- | 13,24,050/- |
| | **Note -** The price of Buy Back Xerox Machine is Rs.1,58,520/-It Will be deducted from the final amount | | 1,58,,520/- | 1,58,,520/- | 1,58,,520/- |
| | | **Total Amount** | **<u>11,62,170/-</u>** | **15,96,030/-** | **11,65,530/-** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.कायोसेरा डॉक्युमेंन्ट्स सोल्युशन इंडिया प्रा.लि. पुणे यांचे झेरॉक्स मशिन खरेदीकामी बायबॅक मशिनचे दर वजा करता एकुण दर हे कमी (न्युनतम) आहेत.

तरी सामान्य प्रशासन विभागास २ (अ.क्र.१ व २) व साईबाबा इंग्लिश मिडीयम सकुलकरिता १ (अ.क्र.३) झेरॉक्स मशिन खरेदीकामी दि.०६.०४.२०१५ रोजी उघडण्यात आलेल्या व्यापारी लिफाफ्यातील दरांच्या तुलनात्मक तक्त्यातचे अवलोकन करुन सदर खरेदीबाबत योग्य तो निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्य.समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सामान्य प्रशासन व इंग्लिश मिडीअम स्कूल करिता झेरॉक्स मशिन खरेदीबाबत विभागाच्या मागणीनुसार, शासनाकडील उपलब्ध दरपत्रकासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१४** **सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च -२०१६) करिता गावरान तुप खरेदीचे निविदेबाबत.**

**प्रस्ताव** सन २०१५-१६ (माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी आवश्यक किराणामाल (भाजीपाल्यासह) खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७७,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मा.व्य.समितीचे दि.३०.०१.२०१५ चे सभेतील निर्णय क्र.१८ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरलेले आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे विधी विभागामार्फत मान्यतेसाठी पाठविण्यात आल असता, मा.उच्च न्यायालयाने दि.१३.०३.२०१५ रोजी गावरान तुप खरेदी करिता स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेस व उर्वरीत किराणा माल खरेदी करणेकामी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार खरेदी विभागाकडील दि.०७.०३.२०१५ रोजीचे टिपणीनुसार तसेच मा.त्रिसदस्य समितीने दि.०९.०३.२०१५ रोजी कार्यवाही करणेस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मा.उच्च न्यायालयाचे निर्णयास अधीन राहुन सन २०१५-१६ चे गावरान तुप खरेदीची पुर्वतयारी करणेकामी दि.१७.०३.२०१५ ते दि.२०.०३.२०१५ अखेर विविध वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन अमुल, गोकुळ, महानंदा, विकास, हटसन वारणा इ. नामांकित गावरान तुप उत्पादक कंपन्यांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. तसेच प्रस्तावित निविदेची किमंत रु.१,०००/- मात्र व निविदेसोबत बयाणा रक्कम रु.६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख मात्र) अशी ठेवणेत आलेली आहे. निविदेसोबत आवश्यकतेनुसार १. दुकान नोंदणी दाखला/मार्केट यार्ड लायसेन्स/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/उत्पादक संस्थेचा दाखला (उदा.ग्रामपंचायत, नगर पंचायत, नगरपालिका), २. सेल्स टॅक्स/सेंट्रल सेल्स टॅक्स नोंदणी दाखला, व्हॅट टिन नंबर, ३. अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना (FSSA परवाना आवश्यकतेनुसार), ४. अॅगमार्क परवाना, ५. सन २०१३-१४ चा वार्षिक उलाढालीबाबत चार्टर्ड अकौंटटचा ऑडीट अहवाल, ६. पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रांची ऑनलाईन तसेच बयाणा रक्कम व निविदा फि ची रक्कम ऑनलाईन पेमेंट मोडमध्ये मागणी करणेत आलेली आहे. तसेच सदर निविदेचा कालावधी खालीलप्रमाणे ठेवण्यात आलेला होता.

| अ.नं. | करावयाच्या कार्यवाहीचा तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| ०१. | वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्धी | दि.२०.०३.२०१५ |
| ०२. | वेबसाईटवर ई-टेंडर प्रसिद्ध करण्याची दिनांक व वेळ | दि.२०.०३.२०१५ सकाळी ११.०० वा. |
| ०३. | ई-टेंडर डाऊन लोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.०४.०४.२०१५ सायं.०५.०० वा. |
| ०४. | तांत्रिक लिफाफे उघडण्याची दिनांक व वेळ | दि.०६.०४.२०१५ सकाळी ११.०० वा. |
| ०५. | मुळ निविदा (Financial Bid) उघडणे | मा.त्रिसदस्य समितीचे सभेत. |

तसेच मा.मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी सुचित केलेप्रमाणे निविदाधारकांकडून कोणत्याही प्रकारचे लिफाफे अथवा नमुने प्रत्यक्ष स्विकारण्यात आलेले नाहीत.

वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार सबंधीत कंपन्यांना दि.३१.०३.२०१५ रोजी दुरध्वनीद्वारे तसेच दि.०१.०४.२०१५ रोजी ई-मेल करुन निविदेमध्ये सहभागी होणेबाबत कळविलेले आहे. तसेच सदर ई-निविदेमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्पादक सहभागी व्हावे, या हेतूने दि.०१.०४.२०१५ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी सुचित केलेप्रमाणे सदर ई-निविदेबाबत खरेदी विभागाकडील दि.०१.०४.१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार खालीलप्रमाणे बदल केलेले होते.

| अ.नं. | करावयाच्या कार्यवाहीचा तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| ०१. | वेबसाईटवर ई-टेंडर प्रसिद्ध करण्याची दिनांक व वेळ | दि.२०.०३.२०१५ सकाळी ११.०० वा. |
| ०२. | ई-टेंडर डाऊन लोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.०९.०४.२०१५ सायं.०५.०० वा. |
| ०३. | तांत्रिक लिफाफे उघडण्याची दिनांक व वेळ | दि.११.०४.२०१५ सकाळी ११.०० वा. |
| ०४. | मुळ निविदा (Financial Bid) उघडणे | मा.त्रिसदस्य समितीचे सभेत. |

तसेच सबंधीत कंपन्या, उत्पादक, वितरक यांना दि.०६.०४.२०१५ रोजी दुरध्वनीद्वारे व दि.०७.०४.२०१५ रोजी ई-मेल करुन निविदेमध्ये सहभागी होणेबाबत पुन्हा कळविण्यात आलेले होते.

त्यानंतर दि.११.०४.२०१५ रोजी प्राप्त निविदेतील ऑनलाईन तांत्रिक लिफाफे मा.कार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी तसेच मुख्यलेखाधीकारी यांचे दुरध्वनीवरील संमतीने समक्ष उघडण्यात आलेले आहेत. सदरवेळी ०५ निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या निर्देशनास आलेले आहे. त्यातील कागदपत्रांची लेखाशाखेमार्फत तपासणी करण्यात आलेली आहे, त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे. सोबतच्या तक्त्यातचे अवलोकन करता सर्व पाचही निविदाधारकांनी निविदेतील मागणीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. त्यामुळे वरिष्ठांचे सुचनेनुसार सदर निविदेतील व्यापारी लिफाफे उघडण्याची दि.१३.०४.२०१५ अशी ठेवणेत आलेली होती. दि.१३.०४.२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब, प्रशासकीय अधिकारी तसेच मुख्यलेखाधीकारी व निविदाधारक यांचे समक्ष सदर निविदेतील ऑनलाईन व्यापारी लिफाफे उघडण्यात आली.

**विभागाचा अभिप्राय-** सदरचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. सदर निविदेमध्ये निविदाधारकांकडून गावरान तुपाचे प्रति क्विंटलचे दर मागणी करण्यात आलेले होते, मात्र मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर यांनी प्रति क्विंटल ऐवजी प्रति किलोचे दर नमुद केलेले होते. त्यामुळे ऑनलाईन तुलनात्मक तक्त्यामध्ये मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर यांचे दर न्युनतम दिसत आहेत. मात्र सदरचे दर हे प्रति क्विंटलमध्ये वर्ग करणे गरजेचे आहे.

सर्व निविदाधारकांचे प्रति क्विंटलचे दर ग्राह्य धरुन तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केल्यास

१. मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचे प्रति क्विंटल रु.२९,६००/- मात्र हे दर न्युनतम आहेत.

२. मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर यांचे प्रति क्विंटल रु.३०,७००/- मात्र हे दर द्वितीय न्युनतम आहेत.

३. मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई यांचे प्रति क्विंटल रु.३१,०००/- मात्रे हे दर तृतीय न्युनतम आहेत.

तसेच त्यानंतर मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ लि., कोल्हापूर यांचे प्रति क्विंटल रु.३२०२५/- मात्र व मे.गुजरात को.ऑप.मिल्क मार्केटींग फेडरेशन लि., आनंद यांचे प्रति क्विंटल रु.३५,६००/- मात्र असे आहेत.

**मागणी-** तरी सन २०१५-१६ करिता लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागास आवश्यक १०,१०० क्विंटल गावरान तुप खरेदीचे निविदेतील मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर यांचे दर प्रति किलो ऐवजी प्रति क्विंटल असा करणेस व सदर खरेदीबाबत तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन होऊन योग्य निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्य.समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकरिता नामांकित कंपनीचे गावरान तुप खरेदी करणेत यावे, असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश आहे परंतु नामांकित कंपन्या संस्थानसाठी गावरान तुप पुरविणेस प्रतिसाद देत नाहीत. तसेच सन २०१५-१६ करिता संस्थानसाठी गावरान तुप खरेदीकामी राबविणेत आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी हे निम्नतम दरधारक आहेत व पूर्वी मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून निम्नतम दराने गावरान तुप खरेदी केलेबद्दल मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल झालेला आहे. त्यामुळे सध्याच्या निम्नतम दरधारकाकडून सन २०१५-१६ करिता संस्थानसाठी आवश्यक असलेले गावरान तुप खरेदी करावे किंवा नाही याबाबत समितीने निर्णय घेतला नाही. गावरान तुप खरेदीकामी मार्गदर्शन मिळणेसाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१५** **साईनिकेतन इमारतीतील भाडेकरुंकडून वसूल करावयाचे मालमत्ता कराबाबत.**

**प्रस्ताव-** बृहन्मुंबई महानगरपालिकेने 1 एप्रिल, 2010 पासून भांडवली मुल्यावर मालमत्ता कर आकारणी करण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिकेने संस्थान इमारतीचे भांडवली मुल्य रु.७,४७,७१,२३०/- ठरविले आहे. महानगरपालिकेने दिलेल्या ANNEXURE "A" मध्ये प्रत्येक मजल्यावरील प्रत्येक फ्लॅट धारकाला किती मालमत्ता कर लागला आहे त्याची रक्कम दर्शविली आहे. संस्थानचे दादर, मुंबई येथील साईनिकेतन इमारती मधील ६ फ्लॅट धारकांकडून व आऊट हाऊसमधील ३ भाडेकरुंकडून भांडवली मुल्यांवर आधारित असलेला मालमत्ता कर खाली दर्शविल्याप्रमाणे वसूल करणे आहे.

| अ.नं. | भाडेकरुचे नाव | फ्लॅट/रुम नं. | एकूण प्रॉपर्टी टॅक्स 2011-2012 | एकूण प्रॉपर्टी टॅक्स 2012-2013 | एकूण प्रॉपर्टी टॅक्स 2013-14 | एकूण प्रॉपर्टी टॅक्स 2014-15 |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.एफ.के.बलसारा (तळमजला) | फ्लॅट नं.1 | 3042/- | 3042/- | 3042/- | 3042/- |
| 02 | श्रीमती महारुख जिमी बानाजी (तळमजला) | फ्लॅट नं.2 | 3042/- | 3042/- | 3042/- | 3042/- |
| 03 | श्रीमती अनुसया जे शहा व कमलेश जे शहा (पहिला मजला) | फ्लॅट नं.3 | 3590/- | 3590/- | 3590/- | 3590/- |
| 04 | श्रीमती बी.पी.गांधी व डी.आर.गांधी (पहिला मजला) | फ्लॅट नं.4 | 3590/- | 3590/- | 3590/- | 3590/- |
| 05 | श्री.एस.डी.पांडे (दुसरा मजला ) | फ्लॅट नं.5 | 3768/- | 3768/- | 3768/- | 3768/- |
| 06 | श्रीमती बच्ची होमी मिस्त्री (दुसरा मजला) | फ्लॅट नं.6 | 3768/- | 3768/- | 3768/- | 3768/- |
| 07 | श्रीमती लिला राव (आऊट हाऊस) | रुम नं.7 | 102=25 | 102=25 | 102=25 | 102=25 |
| 08 | श्री.एस.जे.अडखले (आऊट हाऊस) | रुम नं.8 | 102=25 | 102=25 | 102=25 | 102=25 |
| 09 | श्रीमती सुनंदा सावंत (आऊट हाऊस) | रुम नं.9 | 102=25 | 102=25 | 102=25 | 102=25 |

याबाबत कार्यालयीन टिपणी सादर केली असता त्यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी रेन्ट ॲक्ट मधील तरतुद तपासुन निश्चित प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार रेन्ट ॲक्ट मधील तरतुदीनुसार अभिप्राय वजा अहवाल विधी अधिकारी, विधी विभाग यांचेकडून मागविणेत आला होता.

विधी अधिकारी यांचेकडील दि.३१/१/२०१५ रोजीचे पत्रान्वये याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

THE MAHARASTHRA RENT CONTROL ACT,1999.

(MAH.ACT NO.18 OF 2000)

Sec: 12 Increase in rent on account of payment of rates,etc.

1) Where a landlord is required to pay to Government or to any local authority or statutory authority in respect of any premises any fresh rate, cess, charges, tax land assessment, ground rent of land or any other levy on lands & building or increase in rate, cess, changes,tax,land assessment, ground rent of land or any other levy on lands and building, he shall, not with standing anything contained in any other provisions of this Act but save as otherwise expressly provided in any other law for the time being inforce,be entitled to make an increase in the rent of such premises Provided that, the increase in rent shall not exceed the amount on any such rate, cess, charges, tax, land assessment ground rent of land or any other levy on lands & building,as the case may be.

याबाबत Property tax संस्थानच्या भाडेकरुंकडून वसुल करता येईल. याकरीता संस्थानतर्फे सदर इमारतीकरीता भरणेत आलेला टॅक्स प्रत्येक भाडेकरुकडून त्या त्या प्रमाणे वसूल करणेकामी पत्र देऊन संस्थानने भरलेला टॅक्स वसूल करणेकामी कार्यवाही करता येईल.

प्रस्तुत प्रकरणी सन २०१३-१४ चे लेखापरीक्षणातही खालीलप्रमाणे मुद्दे नमुद करण्यात आलेले आहे.

| **Sr. no.** | **Auditor's Observations & Opinions** | **Compliance** |
|---|---|---|
| 1 | Flats situated at Sai Niketan,Dadar, Mumbai have been rented out it is seen that Sansthan Charges them very meagerly rent and the same has not been changed for last so many years. Sansthan must revise the Rent every year, in accordance with the provisions of Bombay Rent Act,1947. Even the Property tax and repairs cess in respect of the premises used by should be recovered from the tenants. | The action is in the process to issue the notices for recovering the taxes from the related tenants of the Sansthans Sainiketan Building as per the B.M.C. rate card of Property and other taxes through the Law and Property Tax Department of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. |

साईनिकेतन इमारतीत सध्या अस्तित्वात असलेल्या भाडेकरुकडून प्रॉपर्टी टॅक्स वसूल करणेकामी नोटीस मसुदा तयार करुन सोबत जोडलेला आहे. मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन साईनिकेतन इमारतीत सध्या अस्तित्वात असलेल्या भाडेकरुंकडून प्रॉपर्टी टॅक्स भरणेबाबत त्यांना सोबतच्या नोटीसीनुसार कळविता येईल.

मा. त्रिसदस्य समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.११८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मुंबई येथील साईनिकेतन इमारतीतील भाडेकरुंकडून प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मालमत्ता कर वसूल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१६** **मौजे मुसळगाव, ता.सिन्नर येथील पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य, सामाजिक, धार्मिक कार्यासाठी देतांना आकारण्यात येणा-या रकमेमध्ये वाढ करणेबाबत**

**प्रस्ताव-** मुंबई व परिसरातुन येणा-या पदयात्री साईभक्तांसाठी निवासाची व अल्प मुक्कामाची सोय व्हावी म्हणून मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०१ एप्रिल २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८७ अन्वये मौजे मुसळगाव (सिन्नर तालुका औदयोगिक सहकारी वसाहत) या ठिकाणी दिर्घमुदतीच्या भाडेपट्टयाने घेतलेल्या जागेमध्ये पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) उभारणेत आलेला आहे. सध्या सदर पालखी थांब्याचा वापर पालखी पदयात्री भक्तांच्या तात्पुरत्या निवासासाठी करणेत येत आहे.

मा. व्यवस्थापन स्थानिक उपसमितीचे दिनांक ०३ एप्रिल, २०१० रोजीचे सभेतील शिफारशीनुसार मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ एप्रिल, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५८ नुसार, सिन्नर व पांढुर्ली येथील पालखी थांबे स्थानिक रहिवाशांना, पालखी सोहळे ज्या कालावधीत कमी असतील त्यावेळेस लग्नकार्य, सामाजिक, धार्मिक कार्यासाठी रुपये ५०००/- मात्र प्रति दिवस (२४ तासांसाठी) भाडे आकारुन उपलब्ध करुन देणेत यावे, असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार सदर पालखी थांबा लग्नकार्य, सामाजिक, धार्मिक कार्यासाठी रुपये ५०००/- प्रति दिवस (२४ तासांसाठी) भाडे आकारुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर पालखी थांब्यासाठी घेण्यात आलेल्या जागेचे स्थानिक कर प्लॉट व्यवस्थापन खर्च, ग्रामपंचायत कर, सभासद फी इत्यादी सन २०१४-१५ या वर्षात एकूण रु.३२३५८/- संस्थानने भरणा केलेली आहे. सदर करांमध्ये वेळोवेळी वाढ होत असते.

**प्रस्ताव-** मौजे मुसळगाव, ता.सिन्नर येथील पालखी थांबा लग्नकार्य, सामाजिक, धार्मिक कार्यासाठी देणेकामी आकारण्यात येणा-या रकमेमध्ये वाढ करुन रुपये ५०००/- ऐवजी रु.१०,०००/- करणे प्रस्तावीत आहे.

**इकडील विभागाचे मत-** प्रस्तुत प्रकरणी रकमेमध्ये वाढ करुन रुपये ५०००/- ऐवजी रु.१०,०००/-करणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करुन होणा-या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

**निर्णय क्र.११९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे मुसळगाव, ता.सिन्नर येथील पदयात्री भक्तनिवास (पालखी थांबा) लग्नकार्य, सामाजिक अथवा धार्मिक कार्यासाठी देतांना आकारण्यात येणा-या रकमेत वाढ करुन ती रक्कम रु.१०,०००/- मात्र करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय क्र.१७** **श्री पतिंगराव रंगनाथ शेळके, शिर्डी स.नं. २१२/२ व २१२/३ क्षेत्र ०१ हे. ४० आर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके, रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २१२/२ व २१२/३ मधील अंदाजे क्षेत्र ३.५० एकर जमीन संस्थानला सरकारी नियमाप्रमाणे विकत देणेस तयार आहे, लवकरात लवकर निर्णय देण्यात यावा असा दि.८/५/२०१४ रोजी प्रस्ताव दिलेला आहे. प्रस्तावामध्ये सदरचे क्षेत्र सुधारित विकास आराखडयानुसार संस्थानकरीता शैक्षणिक कामासाठी आरक्षीत असल्याचे नमुद केले आहे.

इकडील दि.२३/५/२०१४ रोजीचे पत्रान्वये शिर्डी नविन विकास आराखडयाची माहिती/वस्तुस्थिती कळविणेस मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना विनंती केली. त्यानुसार मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.१६/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, शिर्डी नगरपंचायतीची हद्दवाढ सन २००१ मध्ये करण्यात आली असून वाढीव हद्दीचा प्रारुप विकास आराखडा शासनाचे मंजूरीसाठी मा.उपसंचालक नगररचना, नाशिक यांचेमार्फत सादर करण्यात आलेला आहे. सादर करण्यात आलेल्या प्रारुप विकास योजनेनुसार स.न.२१२ व स.नं.२१३ चे क्षेत्रामध्ये दक्षिण उत्तर १५ मीटर रस्ता दर्शविणेत आलेला असून सदर रस्त्याचे पूर्वेकडील क्षेत्र श्री साईबाबा संस्थानसाठी शैक्षणीक हेतु करीता आरक्षीत असून त्याची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान दर्शविण्यात आलेली आहे. वाढीव हद्दीची अंतिम विकास योजना शासनाकडून मंजूर झाल्यानंतर व शासनाकडून मंजूर नकाशा प्राप्त झाल्यानंतर संस्थानला त्याप्रमाणे कळविण्यात येईल.

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी उपरोक्तप्रमाणे दिलेल्या माहितीसह सदरचा जमीन मालकांचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३/८/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.६२८ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींच्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमीन संस्थानला घेणेसाठी त्या जमिनीची अंतिम किंमत बाजार भावाप्रमाणे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून निश्चित करावी व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे अर्ज करावा व त्यातील आदेश/परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी असे ठरले. "

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाचे अनुषंगाने दुय्यम निंबधक, राहाता यांचेकडून प्रस्तुत जमीनीचे शासकीय दराची माहिती देणेस विनंती केलेनंतर त्यांनी दि.१३/८/२०१४ चे पत्राने कळविल्याप्रमाणे सन २०१४ चे बाजारमुल्य दर तक्त्यात विभाग क्र.१/६०अ मध्ये समाविष्ठ आहेत. सदर विभागात प्रति चौ.मी. दर रु.७९००/- म्हणजेच प्रति आर (१०० चौ.मी.साठी) रु.७,९०,०००/- आहेत. अशी माहिती प्राप्त आहे.

मा.दुय्यम निबंधक, राहाता यांनी दिलेले दराबाबत जमीन मालक यांना अवगत करुन याकामी चर्चेसाठी दि.२७/८/२०१४ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयात समक्ष उपस्थित राहणेत यावे असे कळविण्यात आले आहे.

दि.२८/८/२०१४ रोजी जमीन मालक यांनी मा.उपकार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित पत्राने लेखी दिलेले आहे की, दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेले शासकीय दर प्रति चौ.मी. रु.७९००/- म्हणजे प्रति आर (१०० चौ.मी.) रु.७,९०,०००/- दर मान्य आहे. परंतु त्यात आमची मागणी अशी आहे की जर आमचा खरेदी व्यवहार सन २०१५ मध्ये झाल्यास त्या वर्षीचा शासकीय दर प्रती गुंठा जो असेल त्या दराने खरेदी करावी अशी विनंती करणेत आली असून जमीनमालक व संस्थान यांचे मध्ये झालेल्या पत्रव्यवहाराची माहिती याप्रमाणे सादर आहे. दि.२१/१०/२०१४ रोजीच्या कार्यालयीन मंजूरीने प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे जमीन खरेदीबाबत (१+३ जमीनमालक) मान्यतेसाठी संस्थानचे वकीलामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२३१५/ २०१४ दि.३/११/२०१४ रोजी सादर करण्यात आले.

सदर अर्जाने खालीलप्रमाणे विनंती मा.कोर्टाकडे prayer clause मध्ये आहे.

(B) By allowing this application, Applicant-committee may be permitted to purchase the agricultural land Gat No.143/5 to the extent of Hector 1.515 situated at village Kankuri, land Gat No.203/1,203/2 admeasuring Hector 1.20 situated at Shirdi town, land Gat No.212/2 and 212/3 admeasuring Hector 1.40, land Gat No.213/1 situated at Shirdi town admeasuring Hector 0.80 by prevailing market rates certified by the Sub Registrar of the concerned region. केलेली आहे.

सदर अर्जाबाबत मा.उच्च न्यायालयाचा आदेश दि.१३/३/२०१५ रोजी झाला आहे.

The civil application is allowed in terms of prayer clause 'B'

मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठाने जमीन खरेदीसाठी वरील प्रमाणे परवानगी दिलेली आहे.

संस्थानचे वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेकडून प्रस्तुत जमीनीचा सर्च रिपोर्ट घेण्यात आलेला आहे.

मा.मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी दि.२७/३/२०१५ रोजीचे पत्रान्वये शिर्डी वाढीव विकास (बिरेगाव हद्द) योजना शासन निर्णय क्र.टिपीएस-१६१२/५२२ (न) पुर्नबांधणी क्र.५८/प्र.क्र.१०३/१२/नवि-९ दि.२८ डिसेंबर,२०१२ अन्वये मंजूर झाली असल्याचे कळविले आहे.

अर्जदार यांचे स.नं.२१२ मधील शिर्डी वाढीव विकास आराखडयानुसार आरक्षीत क्षेत्राची माहिती शिर्डी नगरपंचायत यांचेकडून मागविली असता मा.मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,यांनी दि.२४/३/२०१५ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या माहितीनुसार श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके यांचे आरक्षीत क्षेत्र अंदाजीत १५७३० चौ.मी.व १५ मीटर रुंद १२१५ चौ.मीटर डी.पी.रोड साठी आहे.

श्री.शेळके यांनी दि.२८/८/२०१४ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांना अग्रेषित पत्राने लेखी दिलेले आहे की, दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेले शासकीय दर प्रति चौ.मी. रु.७९००/- म्हणजे प्रति आर (१०० चौ.मी.) रु.७,९०,०००/- असल्याचे कळविले.सदरचा दर मान्य आहे. परंतु त्यात आमची मागणी अशी आहे की जर खरेदी व्यवहार सन २०१५ मध्ये झाल्यास त्या वर्षीचा शासकीय दर प्रती गुंठा जो असेल त्या दराने खरेदी करावी.

मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडील सन २०१४ व सन २०१५ मधील मुल्यांकनानुसार प्रस्तुत जमीनीची रक्कम खालील प्रमाणे होत आहे.

| सन २०१४ चे दर | क्षेत्र चौ.मी. | एकूण रक्कम | सन २०१५ चे दर | क्षेत्र चौ.मी. | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ७९००/- | १५७३० | १२,४२,६७,०००/- | ८७००/- | १५७३० | १३,६८,५१,०००/- |

सदर जमीन मालक यांनी दि.२७/३/२०१५ रोजी स्टॅम्प पेपरवर अंडरटेकींग दिले आहे. सदर जमीन खरेदीखत करतेवेळी मला मिळणा-या जमीन मोबदला रकमेपैकी, मी दिलेल्या दि.२८/८/२०१४ चे पत्राप्रमाणे प्रचलीत दराने (Ready Recnor) प्रमाणे मिळणा-या एकूण रक्कमेपैकी तीस टक्के (३०%) रक्कम संस्थान खाती राखुन ठेवुन, आगामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.८/४/२०१५ रोजी होणा-या सभेत जमीन दराबाबत जो निर्णय होईल,तो निर्णय मला मान्य आहे, असे दि.२७/३/२०१५ रोजी सोबतच्या प्रमाणे अंडरटेकींग सादर केले आहे.

तसेच दि.६/१०/२०१४ व दि.१८/१०/२०१४ रोजीचे पत्राप्रमाणे नविन विकास आराखडयामध्ये शिर्डी साकुरी शिवापासून (बिरेगाव रस्ता) १८ मीटर रस्ता होईपर्यत सदरच्या जमीनीत जाण्याकरीता आम्ही संमती देत आहोत असे लेखी दिलेले आहे.

**इकडील विभागाचे मत-** मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी प्रचलित दराने खरेदीस मान्यता दिलेली असली तरी सदर सिव्हील अर्ज दाखल करताना मा. व्यवस्थापन समितीचा दि.०३/०८/२०१४ चा ठराव (Exhibit म्हणून) दाखल आहे. सदर ठरावाचे वेळी त्यावेळेचे सन २०१४ चे शासकीय दर अभिप्रेत आहे.

दि.८/५/२०१४ चे मुळ प्रस्तावानंतर, ठरावानंतर व कोर्ट ऑर्डर होणेचे दरम्यान जमीन मालक यांनी व्यवहार सन २०१५ झाल्यास त्यावेळेचा प्रती गुंठाचा दर मिळावा व नुकतीच ३० टक्के रक्कम मोजणी व किंमत ठरविणे इत्यादीसाठी संस्थानकडे ठेवून उर्वरीत रक्कम देवून जमीन खरेदी लवकर करावी अशी मागणी केली आहे.

या सर्व बाबी विचारात घेऊन खालील निर्णयार्थ सादर.

१. दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडील सन २०१४ किंवा सन २०१५ चे रेडीरेकनरप्रमाणे जमीन मोबदला किंमत देऊन जमीन खरेदी करणे.
२. मोजणी करुन आरक्षीत क्षेत्र जमीन मालकाने निश्चित करुन याबाबत पुर्तता करणे तसेच
३. टाऊन प्लॅनींग तसेच नगरपंचायत यांचा जमीन खरेदीस ना हरकत दाखला याबाबत जमीन मालकाकडून पुर्तता करणे तसेच
४. भूमि अभिलेख कार्यालय,राहाता यांचेकडून अंतिम मोजणी होऊन क्षेत्र व हद्दीच्या खुणा निश्चीती करणेची पुर्तता करणे.
५. वरील अ.नं. २ ते ४ याबाबत पुर्तता होईपर्यत जमीन मालकाकडून निर्णयाप्रमाणे मोबदला ठरलेल्या रकमेचे ३० टक्के हिशोबाने होणारी रक्कम संस्थानकडे बिनव्याजी राखून ठेवणे बाबत. (पुर्तता अ.नं.२ ते ४ बाबत) तसेच जमीन खरेदी संस्थान खर्चाने (स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी इत्यादी) वकीलांचे सल्ल्याने करता येईल.

**निर्णय क्र.१२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके, शिर्डी यांचे प्रस्तावित क्षेत्र सुधारित विकास आराखडयानुसार संस्थानकरीता शैक्षणिक कामासाठी आरक्षीत असल्याचे दिसून येते. सबब सदरहू क्षेत्र भू-संपादनामार्फत संस्थानला घेणेसाठी त्वरीत भू-संपादनाची कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१८** **एल.पी.गॅस प्लॅन्ट करीता गॅस कॉम्प्रेसर व अनलोडींग होज पाईप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** जुन्या गॅस टॅंकमध्ये एल. पी. गॅस अनलोड करणेकरीता एल.पी. जी. कॉम्प्रेसर व गॅस होज पाईप खरेदी करणेस व त्याकामी विहीत पद्धतीने जाहीरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. 8,50,000/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 5.6.2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 384 नुसार मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दिनाक 19.11.2014 रोजीचे दै. सार्वमत व संस्थान वेबसाईट जाहीरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. टेंडर विक्री दिनांक 20.11.2014 ते दिनांक 29.11.2014 अशी होती. सदर कालावधीत तीन

टेंडरधारकांनी टेंडर विकत घेऊन मुदतीत जमा केलेले होते. त्यानुसार प्राप्त टेंडर दिनांक 23.12.2014 रोजीचे मा. उपसमिती सभेमध्ये उघडण्यात आलेले असून टेंडरमधील दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे:

| अ.नं. | टेंडर सादरकर्त्यांचे नाव | टेंडरमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री, प्रा.लि. गोरेगाव, मुंबई | 18,00,000/- |
| 2. | आयडेक्स इंडीया प्रा. लि.अंधेरी, मुंबई | 10,80,000/- |
| 3. | मे. गॅस टेक्नोक्रेटर्स, लोवर परेल, मुंबई | 21,50,000/- |

यावर दिनांक 30.1.2015 रोजीचे त्रिसदस्यीय समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन गॅस कॉम्प्रेसर व होज पाईप खरेदीकामी प्राप्त झालेल्या तीन निविदापैकी आयडेक्स इंडीया प्रा. लि. मुंबई यांनी निविदेतील मागणीप्रमाणे दर दिलेले नाहीत. त्यामुळे ते अपात्र ठरत आहेत. तसेच उर्वरीत दोन्ही निविदांमध्ये आलेले मुळ दर व खर्चास मिळालेली मान्यता यामध्ये फारच तफावत दिसून येत असल्यामुळे याकामी येणाऱ्या खर्चासह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

एल.पी. गॅस कॉम्प्रेसर व होज पाईप खरेदीकामी उपरोक्त निविदा धारकांच्या दरांनुसार अंदाजे रक्कम रु. 18 लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास प्रथम मा. त्रिसदस्यीस समिती ची मान्यता घ्यावी लागणार असून त्या मान्यतेनंतर मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडेस प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे. मा. औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेतलेनंतर ई-निविदाद्वारे टेंडर मागविता येणे शक्य होईल.

तरी एल.पी.जी. अनलोडींग होज पाईप व कॉम्प्रेसर खरेदी करणेकामी कंत्राटदार/ पुरवठाधारक यांचेकडुन ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.18,00,000/- (अक्षरी रुपये आठरा लाख मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी तसेच यास मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद हायकोर्ट यांचेकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस व त्यासंबंधी मान्यतेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय (व्यवस्थापन) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, एल.पी.गॅस प्लॅन्ट करीता गॅस कॉम्प्रेसर व अनलोडींग होज पाईप विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१८,००,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**तसेच उपरोक्तकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रक व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** अ( श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था .त्रिसदस्य समिती पहात आहे.चे कामकाज सध्या मा (शिर्डी) अधिनियमातील कलम17 अन्वये समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम)-2)(कनुसार वार्षिक ( :अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे -विश्वस्तव्यवस्थेच्या जमा (समिती)खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तकडे पाठवील .

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे सोबत सन .2015-16 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यातील जमाखर्चाच्या - .:ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत

**जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ.नं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक 2014-15 | अंदाजपत्रक 2015-16 रक्कम | एकूणशी % | वाढघट/ □(टक्के) % |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रारंभीची शिल्लक | 25,78,82,334 | 60,500,000 | 77 | 23 |
| 2 | देणगीद्वारे मिळणारी अपेक्षित जमा | 376,01,00,000 | □434,17,50,000 | 15 | 15 |
| 3 | अपेक्षित महसुली जमा | 201,44,00,000 | 212,10,25,000 | 5 | 5 |
| 4 | **एकूण जमा (2+3):-** | **577,45,00,000** | **646,27,75,000** | □21 | 11 |
| 5 | अपेक्षित निर्गतवणूक | 119,97,92,666 | 267,98,48,500 | 123 | 123 |
| | **एकूण अपेक्षित जमा (1+4+5) :** | **723,21,75,000** | **920,39,23,500** | □27 | 31 |

**खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अनं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक 2014-15 | अंदाजपत्रक 2015-16 रक्कम | एकूणशी % | वाढघट/ □ % |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अपेक्षित भांडवली खर्च | 342,86,24,000 | 491,56,20,000 | 43 | 43 |
| 2 | अपेक्षित महसुली खर्च | 83,42,35,000 | 90,73,08,000 | 9 | 8 |
| 3 | अपेक्षित किरकोळ खर्च | 1,02,98,000 | 1,69,31,000 | 64 | 64 |
| 4 | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | 239,76,07,000 | 266,33,45,000 | 11 | 11 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | 50,09,11,000 | 64,01,44,500 | 28 | 27 |
| 6 | एकूण खर्च )1 ते 5) :- | 717,16,75,000 | 914,33,48,500 | 155 | 27 |
| 7 | अंतिम शिल्लक | 6,05,00,000 | 6,05,75,000 | 0 | 0 |
| | **एकूण अपेक्षित खर्च )6 ते 7:-** | **723,21,75,000** | **920,39,23,500** | **27** | **27** |

**ब(** अधिनियम2004 चे कलम 22 (2) मधील तरतुदींनुसार,च्व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईलराज्य शासनास ., आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल.

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या 10 टक्के खर्च अपेक्षित आहे सन . 2015-16 या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहुन करता येईल .

सन 2004-05 ते 2009-10 या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी मा व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व . न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले होते-सासंवि .त्यास शासन निर्णय क्र .2009/547/(57/09)-का दिनांक .सोळा. 21 ऑगस्ट, 2010 अन्वये मान्यता मिळालेली आहे सन .2011-12 या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे तसेच सन .2013-14 या आर्थिक वर्षात प्रायोजीत बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार झालेला खर्च हा तरतुदीपेक्षा कमी आहे सन .2014-15 व 2015-16 या आथिर्क वर्षासाठी व्यवस्थापन निधीतून अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल .

**क(** संस्थानच्या विविध विभागांमार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्यापायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शीर्षाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम .21 अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शीर्षाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे .

**ड(** मायोजना सुरु करणे -तथा-व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च . प्रस्तावित आहे आयकर अधिनियम .1961 चे कलम 10(23) (सी (5 मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी 85 टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे . तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील प ाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे . मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न रुपये736 कोटी मात्र एवढे आहेया अखर्चित उत्पनाचे रुपांतर वेळोवेळी . हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील तीन वर्षात खर्च होणे आवश्यक .गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे असल्यानेभांडवली खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहेअंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली त्यामुळे . .दिसत आहे

तथापि चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या 85% खर्च व अखर्चित उत्पनाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे . त्यामुळे सदरचे अखर्चित उत्पन्न वेळेतखर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होऊन तो भरणे क्रमप्राप्त होईल, अशा आयकराची रक्कमही मोठी असेलअपेक्षित जमा व खर्चाच्या .तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे . अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट अ व ब म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन 2015-16 या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रक व सन 2014-15 या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक यास रुग्णालय विभागासह मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.१२२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रकाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं. २०** **दक्षिणापेटीतून प्राप्त होणारी नाणी (चिल्लर) बॅंकाऐवजी थेट भक्त/व्यापारी/ संस्थांना देऊन त्याऐवजी नोट घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर व मंदिरपरीसरातील दक्षिणा पेटयांची मोजणी सध्या आठवडयातून दोनदा होत असते. दक्षिणा पेटयांमधून प्रत्येक वेळी नोटा व नाणी मिळून साधारणत: २ ते २.५० कोटी इतकी रक्कम प्राप्त होत असते. त्यामध्ये साधारणत: ३ ते ५ लाखाची नाणी प्राप्त होत असतात. सध्या दक्षिणा पेटीतून प्राप्त होणारी नाणी व नोटा त्याचठिकाणी बॅंकाना देण्यात येतात. रक्कम जमा झाल्याची बॅंकेची अधिकृत स्लीपही बॅंक संस्थानला देते. दक्षिणा पेटीतून मिळणा-या रक्कमेची पावती त्याच ठिकाणी मिळाल्याने सदरील व्यवहार तेथेच पूर्ण होतो

दक्षिणा पेटीतून मिळालेली नाणी बॅंकांच्या ताब्यात असल्याने बॅंका सदरील नाणी जादा पैसे घेऊन व्यापा-यांना वितरीत करत असतात. यामध्ये बॅंका अनाधिकृत पैसे कमावत असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये आलेल्या आहेत. तसेच तशा आशयाच्या तक्रारी संस्थानकडेही आलेल्या आहेत.

सदरील नाणी साईचरणी अर्पण झालेली असल्याने ती नाणी आपणास मिळावी ही भक्तांची इच्छा असते. तसेच एकाच ठिकाणी जास्त नाणी मिळत असल्याने टोलनाक्यावाले कंत्राटदार/व्यापारी यांची देखील सदरील नाणी

मिळावी अशी इच्छा असते. त्यासाठी त्यांची नाण्यांच्या किंमती व्यतीरिक्त आणखी देणगीमूल्य देण्याची तयारी असते. सदरील देणगीमूल्य संस्थानला स्पर्धात्मक दर मागवून निश्चित केले तर संस्थानला जास्त देणगीमुल्य देणा-यास नाणी (चिल्लर) देता येतील. तसा करारनामा त्याच्याकडून करुन घेता येतील. तसेच त्याच्याकडून अनामत रक्कमही घेता येईल.

तरी प्रायोगिक स्वरुपात नाण्याचे देणगीमूल्य ठरविणेसाठी दरपत्रके मागवून दर ठरविणेस मान्याता मिळणेकामी सदरील प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र. १२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणापेटीतून प्राप्त होणारी नाणी (चिल्लर) बँकाऐवजी थेट भक्त/ व्यापारी/ संस्थांना देऊन त्याऐवजी नोटा घेणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं. २१** **दरवर्षाप्रमाणे सन २०१६ चे श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संदर्भ- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ चे कलम नं.१७ (२) ठ मधील **तरतुद सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

''श्रीसाईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उदेशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साईबाबा डिल्क्स दिनदर्शिका छपाई करुन किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

सन २०१५ चे श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिकांचे छपाईकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वृत्तपत्रात जाहिरात देवून ई निविदा मागवून,पात्र निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून न्यूनतम दरधारकांकडून छपाई करुन घेण्यात आली होती. दि.१९.०३.२०१५ अखेर शिल्लक साठयाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अं.नं. | छपाई तपशिल | आदेशीत संख्या | छपाई दर | विक्री दर | जमा संख्या | विक्री संख्या | शिल्लक साठा दि.१९.०३.२०१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स २०१५ (८ पेजेस) आकार २२"x३५" | २०,००० | २३४/- | २५०/- | २०००० | १७००० | ३००० |
| २ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स २०१५ (७पाने) आकार १९.२५"x२७.२५" | ९००० | २७९/- | ३००/- | ९००० | ८५०० | ५०० |
| ३ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स कॅलेंडर्स २०१५ (सिंगल पेज) आकार १९"x२७" | ३००० | २३८/- | २५०/- | ३००० | २४०० | ६०० |
| ४ | श्री साईबाबा थ्रीडी – ७ शिटर डेस्क कॅलेंडर्स २०१५ आकार ९ .७५"x०७" | ११००० | २०७/- | २२०/- | ११००० | ११००० | - |

उपरोक्त तक्त्यातील श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिकांचे विक्रीचा प्रतिसाद लक्षात घेता, सन २०१६ करीता प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अं.नं. | तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | अंदाजे दर | अंदाजे दराने अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स २०१६ (८ पेजेस) आकार २२"x३५" | २५,००० | २२५/- | ५६२५०००.०० |
| २ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स २०१६ (७पाने) आकार १९.२५"x२७.२५" | १०००० | २८०/- | २८०००००.०० |
| ३ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स कॅलेंडर्स २०१६ (सिंगल पेज) आकार १९"x२७" | ३,००० | २४०/- | ७२००००.०० |
| ४ | श्री साईबाबा थ्रीडी – ७ शिटर डेस्क कॅलेंडर्स २०१६ आकार ९ .७५"x०७" | १५,००० | २१०/- | ३१५००००.०० |

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निविदाधारकांना चर्चा/वाटघाटीस निमंत्रित करुन, चर्चा वाटाघाटी अंती मान्य होणा-या निम्नतम दराने छपाई कार्यादेश

देणेत येतील. याकामी अंदाजे रु.१२२,९५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर, मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल. मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेनंतर विहीत पध्दतीने छपाईची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात पुस्तके/फोटो/श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु.६,००,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी मात्र) चे अंदाजपत्रकातील तरतूदीमधून उक्त कामासाठीचा छपाई खर्चकरता येईल.दिनदर्शिकांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब प्रस्तावित श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१६ छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु.१,२२,९५,०००/- (अक्षरी रुपये.एक कोटी बाविस लाख पंच्यात्रव हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

२) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे प्रस्तावित सादर करणेस मान्यता असावी.

३) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

४) विहीत पध्दतीने ई निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

**निणर्य क्र.१२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेल्या छपाई संख्येपैकी श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स-२०१६ (८ पेजेस) आकार २२ x ३५ ची २५,००० नगाऐवजी २०,००० नग छपाई करणेत यावी व इतर कॅलेंडर्सची प्रस्तावित केलेल्या संख्येप्रमाणे छपाई करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात. या छपाईकामी येणा-या अंदाजे रु.१,२२,९५,०००/- मात्रचे खर्चास व जाहिरातीसाठी येणा-या खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**मात्र तत्पुर्वी सदरहू छपाईकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२२** **दरवर्षाप्रमाणे सन २०१६ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेबाबत**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ चे कलम नं.१७ (२) ठ मधील तरतुद सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

''श्रीसाईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्यशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी तसेच श्री साई दिनदर्शिका छपाई करुन किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

सन २०१५ चे श्री साई दैनंदिनी तसेच दिनदर्शिकांचे छपाईकामी मा.व्य.समितीचे निर्णयानुसार वृत्तपत्रात जाहिरात देवून ई निविदा मागवून,पात्र निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून न्युनतम दरधारकांकडून छपाई करुन घेणेबाबत ठरल्यानुसार छपाई करण्यात आली होती.दि.१९.०३.२०१५ अखेर शिल्लक साठयाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अं.नं. | तपशिल | मंजूर दर | विक्री दर | आदेशीत संख्या | जमा संख्या | विक्री संख्या | शिल्लक साठा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई दैनंदिनी २०१५ | ६६.०० | ७५/- | १,५०,००० | १,५०,००० | १,५०,००० | - |
| २ | श्री साई दिनदर्शिका २०१५ चे ०१ पानी मोठी (१९"x२९") | १५.३० | २०/- | ३,००,००० | ३,००,००० | ३,००,००० | - |

उपरोक्त तक्त्यातील दैनंदिनी व दिनदर्शिका विक्रीचा प्रतिसाद लक्षात घेता, सन २०१६ करीता प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अं. नं. | तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | अंदाजे दर | अंदाजे दराने अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साई दैनंदिनी २०१६ | ३,००,००० | ७०.०० | २१०००००.०० |
| २ | श्री साई दिनदर्शिका २०१६ चे ०१ पानी मोठी (१९"x२९") | ५,००,००० | २५.०० | १२५०००००.०० |
| | | | एकुण | **३,३५,००,०००.००** |

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीस निमंत्रित करुन,चर्चा वाटाघाटी अंती मान्य होणा-या निम्नतम दराने छपाई कार्यादेश देणेतयेतील.याकामी अंदाजे रु.३,३५,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत

मान्यता मिळालेनंतर, मा.मुंबई उच्च न्यायलय, औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल. मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेनंतर विहीत पध्दतीने छपाईची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०१५-१६ चे अदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु.६,००,००,०००/- चे अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल.सदर दैनंदिनी/ दिनदशिकांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब प्रस्तावित दैनंदिन/ दिनदर्शिका २०१६ छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रु.३,३५,००,०००/- खर्चास मान्यता असावी.

२) मा.मुंबई उच्च न्यायलय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

३) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

४) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.१२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१६ ची श्री साई दैनंदिनी २,००,००० नग व दिनदर्शिका- ४,००,००० नग छपाई करणेत यावी. या प्रकाशनांना प्रतिसाद मिळाल्यास पुढील छपाईचा कार्यादेश देण्यात यावा. याकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात. दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाईकामी येणा-या अंदाजे रु.३,३५,००,०००/- मात्रचे खर्चास व जाहिरातीसाठी येणा-या खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.**

**मात्र तत्पुर्वी सदरहू छपाईकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं. २३ **संस्थानचे विविध विभागाकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरुपयोगी सादिल/ किरकोळ स्वरुपाचे भंगार साहित्याची रु.५०,०००/- वा त्याचे पुढील किमंतीपर्यत वार्षिक कोटेशनचे उच्चत्तम दराने विक्री करणेसाठी मा. शासनाची स्थायी मान्यता घेणेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील तरतूदी-**

महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १७(४) मध्ये " विश्वस्त संस्थेमध्ये निहीत केलेले पन्नास हजार रूपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरी असेल त्याखेरीज समितीतकडून विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाहीत." अशी तरतूद आहे. आपलेकडील निरूपयोगी भंगार साहित्याचे यादीतील विक्री करावयाच्या सर्व वस्तू या जडजवाहीर, दागिणे व इतर जंगम मालमत्ता या स्वरूपात येत नाहीत.

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील ठराव व निर्णय-**

१) मा.व्यवस्थापन समिती दि.२९/०६/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७८ नुसार " सादिल स्वरूपाच्या दैनंदिन वापरामुळे खराब होवून विक्री कामी जमा होणा-या निरूपयोगी टाकाऊ वस्तू स्थानिक परिसरातील व्यापा-याकडून दरपत्रके(निविदा) मागवून वार्षिक उच्चत्तम विक्री करणे संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचा ठराव करून त्याबाबत योग्य निर्णय घेणे योग्य होईल, " असे प्रस्तावीत केलेप्रमाणे मान्यता मिळालेली आहे.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ रोजी झालेल्या सभेत "प्रचलित पध्दतीप्रमाणे येथून पुढे दरवर्षी अशाप्रकारे दैनंदिन वापराने निर्माण होणारे निरूपयोगी सादिल स्वरूपाचे साहित्याची विक्रीकरणे/ विल्हेवाट लावणे संबंधीची कार्यवाही मा.कार्यकारी अधिकारी सो यांनी करावी" असा निर्णय झालेला आहे.

**प्रस्ताविक:-** अभिलेख कक्ष विभागामार्फत संस्थानचे इतर विभागाकडील दैनंदिन वापराचे निरूपयोगी सादिल/ किरकोळ स्वरूपाचे भंगार, टाकाऊ साहित्याची संदर्भ क्र.१ व २ नुसार परिसरातील भंगार साहित्य खरेदी करणा-या व्यापा-यांकडून/ खरेदीदारांकडून निविदा/दरपत्रक मागवून उच्चत्तम दर देणा-या व्यापा-यांना विक्री करण्यात येते. श्री साईबाबा संस्थानकडे अशाप्रकारचे भंगार साहित्य साठविणेकामी पूरेशा प्रमाणात जागा उपलब्ध नसलेने असे साहित्य साठविता येत नाहीत. तसेच त्याच्या साठवणूकीतून दुर्गंधी सुटते, सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे त्याची वेळीच विल्हेवाट लावणे क्रमप्राप्त आहे. यामध्ये रिकाम्या दुधाच्या पिशव्या, तेलकट/खराब पुठ्ठा, गंजलेले कुजलेले पत्र्याचे/लोखंडी भंगार, वेस्ट पॉलीकप, नारळाच्या शेंडया, हॉस्पीटल विभागाकडील निरूपयोगी निरूपयोगी टाकावू औषधांचे रिकामे प्लॉस्टिक ड्रम,रिकामे तेलातूपाचे डबे, रिकामे बारदान गोण्या, प्लॉस्टिक गोण्या वगैरे साहित्याचा समावेश होतो. अशा प्रकारचे साहित्य वेळीच विक्री केल्यास त्यातून मिळणारी रक्कम संस्थान फंडात जमा होते. त्यामुळे संस्थानचे कुठलेही नुकसान न होता आर्थिक फायदाच होतो.

महाराष्ट्र शासन अधिनियम २००५ अधिनियमातील कलम १४ मध्ये " समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्यास अधिन राहून अशाप्रकाच्या नाशवंत अर्पण वस्तूंची लिलावद्वारे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्याचे उत्पन्न विश्वस्त संस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे वगैरे अधिकार आहेत. तसेच कलम १४(ग) नुसार मा.कार्यकारी अधिकारी सो यांना नाशवंत अर्पण वस्तूंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तसंस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे अधिकार दिलेले आहेत. अधिनियमातील कलम १७(४) " विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रूपयांपेक्षा, अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर

मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही,तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही, " अशी तरतूद आहे. उपरोक्त साहित्याचा जडजवाहीर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता या प्रकारात समावेश होत नसल्याने अशा साहित्याची वार्षिक कोटेशनच्या उच्चत्तम दराने शासन मान्यतेने विक्री करण्यात येते.

निरूपयोगी सादिल सवरूपाचे टाकाऊ साहित्यातील काही साहित्याचा अपवाद जसे संस्थानचे प्रसादालय विभागाकडील रिकामे तेलातूपाचे डबे, रिकामे बारदान, गोण्या अशा प्रकारच्या साहित्याची विक्री कधी-कधी रू.५०,०००/- पेक्षा पुढे जाते. त्यामुळे अधिनियम २००५ मधील कलम १७(४) ला बाध येते. अशाप्रकारचे साहित्याची विक्री करणेसंदर्भात तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मौखिक निर्देशानुसार मा.कोर्टाचे Opinion/सल्ला घेणेकामी संस्थानचे विधी विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-विधी/१७०/२०१३ दि.११/१०/२०१३ नुसार Civil application सादर केलेले आहे. परंतू आजपावेतो सदरील विषयी काहीही निर्णय झालेला नाही. याबाबत विधी अधिकारी यांना वेळोवेळी कळविलेले आहे.

सदरील विषयी दि.२०/०२/२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे कार्यालयात विधी अधिकारी यांचेसमवेत चर्चा केली असता सदरचे साहित्य हे निरूपयोगी / टाकावू स्वरूपाचे असल्याने याकामी मा.कोर्टाची मान्यता घेणे जरूरीचे नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम नं.१४ व कलम नं.१७(४) ला अधिन सदरील साहित्य हे कुठल्याही प्रकारे जडजवाहीर साहित्य वा जंगम मालमत्ता या स्वरूपात येत नसलेने त्याचा संबंधीत कलमाशी काही एक संबंध येत नाही, असे मत आहे. यासाठी अशाप्रकारचे दैनंदिन वापराने निर्माण होणारे निरूपयोगी सादिल स्वरूपाचे भंगार साहित्याची रू.५०,०००/- पर्यंत वा कधी-कधी रू.५०,०००/- चे पुढे विक्री करण्यासाठी मा.व्यवस्थापन समिती सभेचा ठराव करून शासन मान्यतेसाठी पाठविता येईल, अशा सुचना (Tips) दिलेल्या आहेत.

**मागणीः-**

**अ)** अधिनियम २००५ मधील कलम नं.१४ व कलम नं. १७(४) ला अधिन राहून रू.५०,०००/- पर्यंत किंमतीचे वा त्यापुढील किंमतीचे कुठलेही दैनंदिन वापराचे निरूपयोगी खराब झालेले सादिल स्वरूपाचे भंगार साहित्य मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेकामी पाठविणेस मान्यता असावी.

**ब)** उपरोक्त कामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा प्रस्तावाबाबत मा.शासनाची स्थायी स्वरूपाची मान्यता मिळणेकामी शासन दरबारी प्रस्ताव सादर करता येईल .

**अभिप्रायः-**

संस्थानमधील दैनंदिन वापराचे निरूपयोगी भंगार साहित्य उदा. तेलातूपाचे डबे दरमहा ५ ते ६ हजार नग डबे विक्रीसाठी उपलब्ध होतात, तसेच रिकामे बारदान/गोण्या, आयटीआय व विदयुत विभागाकडील लोखंडी टाकाऊ साहित्य संबंधीतांकडून अभिलेख कक्षामार्फत विक्रीसाठी कळविले जाते. अशा प्रकारचे तेलातूपाचे डबे, बारदान/गोण्या, लोखंडी सादिल भंगार वस्तू व इतर साहित्य विक्री केल्यास त्यांची रक्कम अंदाजे रू.१,२५,००० ते रू.१,५०,००० चे पुढे जात असलेने व सदरचे साहित्य सातत्याने जमा होत असल्यामुळे ते जमा करणेकामी बंदिस्त जागा उपलब्ध नाही. संस्थानकडून साईभक्तांना सुविधा पुरविणेकामी अडचणी निर्माण होवू नये व भक्तांना तसेच इतरांनांही यापासून सार्वजनिक आरोग्यास धोका पोहचू नये करीता कुठल्याही प्रकारचे दैनंदिन वापराने निर्माण होणारे निरूपयोगी भंगार साहित्य वेळीच dispose (विक्री करणे) करणे अभिप्रेत आहे.

तरी उपरोक्त विषयांकीत प्रस्ताव व मागणीबाबत योग्य त्या निर्णयास्तव व शासनाची स्थायी मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळणेस निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लिलावाद्वारे विक्री करावयाच्या प्रस्तावित साहित्यास महाराष्ट्र शासनाची परवानगी घेणेची महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १७ (४) मध्ये तरतूद दिसून येत नाही. सबब प्रस्तावित निरुपयोगी भंगार वस्तुंची विहीत पध्दतीने निविदा मागवून विक्री करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा हॉस्पीटल स्टाफकरिता स्वतंत्र टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :**

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थानमार्फत गरजू रूग्णांचे सोयीसाठी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल सुरु असून, त्यापैकी नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिमेस श्री साईबाबा हॉस्पीटल व सर्व्हे नं.१४८ पै. मधील जागेत (पूर्वीचे धर्मशाळा इमारतीत) श्री साईनाथ रुग्णालय कार्यान्वीत आहे. सदरहू रुग्णालयांपैकी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. सदर हॉस्पीटलमध्ये येणा-या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने, तसेच सदरहु हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत गरीब व गरजू रुग्णांना सेवा देणेत येत असल्याकारणाने हॉस्पिटलमध्ये बेडची संख्या कमी पडत आहे.

दि.०४/०३/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., वैद्यकिय संचालक, वैद्यकिय प्रशासक, आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांचे प्रतिनीधी श्री. काबरे, उप अभियंता, श्री. डी. एम. देसाई यांनी रुग्णालय परिसराची पहाणी केली त्यावेळी झालेले चर्चेत मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल इमारतीवर वाढीव FSI नुसार

वाढीव एक मजल्याचे बांधकाम करणे, हॉस्पीटलकडील निवासी डॉक्टरांसाठी निवासस्थानाचे बांधकामासाठी तसेच स्टाफसाठी स्वतंत्र टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम तळमजल्यावर योग्य ठिकाणी करणेबाबत सुचना केल्या आहेत.

वरील निर्देशानुसार आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी त्यांचेकडील दि.२५/०३/२०१५ रोजीचे पत्राने, श्री साईबाबा हॉस्पीटल परिसरात स्टाफसाठी स्वतंत्र टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करणेसाठी प्राथमिक आराखडे व अंदाजपत्रक सादर केले असून, त्यामध्ये खालील प्रमाणे खर्च अपेक्षित धरला आहे.

**Toilets for Staff and Doctors in Existing Premises:**

| Sr. No. | Details | Built up Area | Approx. Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Proposed addition of Toilet Block near staircase on G.F. – Bldg. A. | 76.00 Sq. ft | 3000/-. | 2,28,000/-. |
| 02. | Proposed addition of Toilet Block near staircase on G.F. – Bldg. B. | 70.00 Sq. ft | 3000/-. | 2,10,000/-. |
| 03. | Proposed renovation of existing toilet block near staircase on G. F. – (Staff Toilet). | 380.00 Sq. ft | 1500/-. | 5,51,000/-. |
| | | | **Total Amount (Rs.):** | **9,89,000/-.** |

तरी विषयांकीत प्रकल्पासाठी वरीलप्रमाणे ढोबळमानाने रु.९,८९,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरकामी आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांची नेमणूक करुन, त्यांचेकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके तयार करुन याकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल स्टाफकरिता स्वतंत्र टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करणेसाठी प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,८९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **श्री साईनाथ रक्तपेढीचे रक्त पिशवीचे (Whole Blood & PRC) दरात वाढ करणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढी सन २००० मध्ये सुरु करणेत आलेली आहे. रक्तपेढी सुरु करतेवेळी रक्तपिशव्या व रक्तघटकाचे दर निश्चीत करणेत आलेले आहेत. आता WHOLE BLOOD & PACKED RED CELL (PRC) यांच्या दरा मध्ये वाढ करणे आवश्यक आहे कारण...

१) गेल्या १४ वर्षात रक्तपेढीच्या रक्त व रक्तघटकाच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

२) उलट इतर रक्तघटकांचे दर हे नुकतेच (मा. त्रिसदस्यीय समिती निर्णय क्रमांक १०३४ दिनांकः- ३१/०१/२०१५) आपण GOVT. CIRCULAR प्रमाणे कमी केले आहेत. संपुर्ण रक्तांचे (WHOLE BLOOD & PRC) दर मात्र खुपच कमी आहेत. त्यात वाढ करणे आवश्यक आहे.

३) सध्या रक्तपेढी विभागास रक्त साठविणे कामी आवश्यक असलेली रक्त पिशवीची किंमत, रक्तगट तपासणीसाठी लागणारे रिएजंट रक्ताच्या चाचण्या करण्यासाठी येणारा खर्च, रक्त जुळवाजुळवी साठी लागणारे रिएजंट, नवीन अघयावत घेतलेली मशिनरी, मशिनरीजचा मेंटनन्स, इलेक्ट्रीसिटी या सर्वावर होणारा खर्च विचारात घेता, सध्या असलेल्या रक्तपेढीच्या दरात वाढ करणे आवश्यक आहे. प्रत्येक रक्ताच्या पिशवीला येणारा साधारण खर्च खाली दिलेला आहे.

cost per unit for a Single Blood Bag

| Sr. no. | Items | Approximate service Charges Rs |
|---|---|---|
| 1 | Blood bags (Empty)<br>Single Bag – Rs 70 (WHB)<br>Double Bag Rs 140 (PRC +Plasma)<br>Triple Bag Rs 300 (PRC+Plasma+Platelet)<br>Average cost for bag | Rs 200 |
| 2 | HBV, HCV, HIV, VDRL, MP Testing | Rs 300 |
| 3 | Donor Hemoglobin Testing | Rs 10 |
| 4 | Blood Grouping antisera Testing | Rs 30 |
| 5 | Cross - Matching testing | Rs 50 |
| 6 | Chemical - each bag | Rs 30 |
| 7 | Stationery - each bag | Rs 20 |
| 8 | Average salary | Rs 500 |
| 9 | Power (approx) | Rs 50 |
| 10 | Equipment Maintenance | Rs 32 |
| 11 | Glassware | Rs 10 |
| | **Total** | **Rs 1232** |

४)	तसेच इतर सरकारी व ट्रस्ट रक्तपेढयांनीही दरामध्ये Govt Circular प्रमाणे वाढ केलेली आहे . त्यांचा तुलनात्मक दर खाली दिला आहे. आपल्या व इतर जवळील रक्तपेढयांच्या दरामध्ये खुपच फरक पडत आहे.

| Sr No | Product | *Shri Sainath Blood Bank* | | Civil Hosp. A.nagar | | PMT Loni | | Anand Rushiji A.nagar | | Jankalyan Blood Bank. A.nagar | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | *Full* | *Concession* | *Full* | *Concession* | *Full* | *Concession* | *Full* | *Concession* | *Full* | *Concession* |
| 1 | Whole Human Blood (WHB) | *450* | *400* | 1050 | - | 1670 | 1670 | 1050 | 900 | 1250 | 1100 |
| 2 | Packed Red Cell (PRC) | *500* | *400* | - | - | 1670 | 1670 | 1050 | 900 | 1250 | 1100 |

५)	आपले रुग्णालये हे गरीबांसाठीच आहे. त्यामुळे साईनाथ व साईबाबा रुग्णालये यांच्या दरात कमी वाढ (Govt Circular) (१४५० रु.) पेक्षा तर खुपच कमी (८००रु) प्रस्तावीत केली आहे. बाहेरील रुग्णालयांसाठी आपण जास्त दराचा प्रस्ताव ठेवला आहे. रक्त पिशव्या हस्तांतरीत (Issue ) करण्याचे आपल्या रुग्णालयातील प्रमाण हा ७६% आहे. व बाहेरील रुग्णालयांना २४% आहे.

६)	या व्यतिरिक्त आपण थॅलेसेमिया, हिमोफिलिया व सिकल सेल ॲनमिया या रुग्णासाठी मोफत रक्त देतोच. तसेच राजीव गांधी आरोग्य योजनेतील रुग्णांना सुध्दा आपण मोफत रक्त देतो.

७)	Govt Circular (क्रमाक रारसे – २०१३/प्र.क्र.२२४/आ-५ दि.१८/६/२०१४ ) पेक्षा प्रस्तावीत दर कमीच ठेवले आहेत.

नविन प्रस्तावीत दर-

| **Sr No** | **Product** | **शासन मान्य** | **सध्याचे दर** | | **शासन प्रस्तावीत दर** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Full Charge Rs** | **Concession Charge (Vountary Donation Card ) Rs.** | **Full Charge RS.** | | **Concession (Voluntary Card Rs)** | **Charge Donation** |
| | | | | | **Inside संस्थान रुग्णालये** | **Outside बाहेरील रुग्णालये** | **Inside संस्थान रुग्णालये** | **Outside बाहेरील रुग्णालये** |
| १. | Whole Human Blood (WHB) | 1450 | 450 | 400 | 800 | 1200 | 600 | 900 |
| २. | Packed Red Cell (PRC) | 1450 | 500 | 400 | 800 | 1200 | 600 | 900 |

तरी श्री साईनाथ रक्तपेढीचे WHB, PRC व रिझर्वेशन चार्जेस मध्ये वाढ करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२८	उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीमधील रक्त पिशवीचे (Whole Blood & PRC) खालीलप्रमाणे नवीन दर निश्चित करणेत आले.**

| **Sr No** | **Product** | **शासन मान्य दर रु.** | **शासन प्रस्तावीत दर** | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Full Charge RS.** | | **Concession Charge (Voluntary Donation Card Rs)** | |
| | | | **Inside संस्थान रुग्णालये** | **Outside बाहेरील रुग्णालये** | **Inside संस्थान रुग्णालये** | **Outside बाहेरील रुग्णालये** |
| १. | Whole Human Blood (WHB) | १४५०/- | ६००/- | ८००/- | ५००/- | ७००/- |
| २. | Packed Red Cell (PRC) | १४५०- | ६००/- | ८००/- | ५००/- | ७००/- |

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील औषध दुकान चालविणेकामी मूदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ - २ (ण)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-**

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४/०५/२००८ निर्णय क्र. ४१६ (२१)
२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०७/०७/२००८ निर्णय क्र. ५८१
३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १०/०१/२०१० निर्णय क्र. १६२ (६)
४) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/१२/२०१० निर्णय क्र. ९५८

**प्रस्ताविक:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे श्री साईनाथ व श्री साईबाबा असे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येते. सदरचे दोन्ही रुग्णालयात शिर्डी व शिर्डी परिसरातील तसेच श्रीं च्या दर्शनासाठी येणारे भक्त रुग्णालयातअसणा-या सुविधांचा फायदा घेत असतात. श्री साईबाबा रुग्णालयात विविध प्रकारच्या अद्यावत सुविधा रुग्णांचे सोईसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

त्यामध्ये प्रामुख्याने सी. टी. स्कॅन, एम. एम. आय., डायलेसिस, ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टी, हृदय शस्त्रक्रिया, एन्डोस्कोपी, इत्यादी सुविधा उपलब्ध आहे. श्री साईबाबा रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांना जी औषधे संस्थानच्या औषध भांडारात उपलब्ध असतील ती वापरण्यात येतात तर जी औषधे संस्थानचे औषध भांडारात उपलब्ध नसतील ती रुग्णांना बाहेरुन विकत आणावी लागतात. परंतु, बाहेरील खाजगी दुकानदार हे रुग्णांना वाजवीपेक्षा जास्त दर आकारण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बाहेरील खाजगी दुकान हे 24 तास चालू नसतात त्यामुळे रात्रीच्या वेळेस उपचारासाठी दाखल होणा-या रुग्णास औषधे लागल्यास ती मिळू शकत नाही.

याकरिता संस्थानचे व्यवस्थापन समितीने दि. ०७/०७/२००८ चे सभेतील निर्णय क्र. ५८१ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाचे आवारात २४ तास औषधे दुकान ५ वर्षाकरिता भाडे तत्वावर चालविण्यास देण्याचा निर्णय घेतलेला आहे. कारण महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासन यांचे नियमानुसार औषध दुकान चालविण्याचा परवाना मिळविणेकामी कमीत – कमी ५ वर्षाचा कालावधी आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १०/०१/२०१० रोजीचे सभेत अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांनी सदरचे औषध दुकान चालविण्यास दिलेले आहे. तसेच दुकान चालवणेकामी येणारा खर्च वजा जाता सर्व नफा संस्थानला देणगी म्हणून देऊ असा प्रस्ताव अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांनी दिला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र. १९२ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला होता.

"अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांनी आजचे सभेत साईबाबा रुग्णालयात रिटेल मेडिकल स्टोअर चालविणेकामी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावात त्यांनी रिटेल मेडिकल स्टोअर चालविण्यासाठी येणारा खर्च व मेन्टेनन्स खर्च इत्यादी वजा जाता राहिलेला नफा संस्थानला देणगी म्हणून देण्यात येईल अशी विनंती केलेली होती. यावर चर्चा होऊन, याकामी अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांना रिटेल मेडिकल स्टोअर चालविण्यासाठी येणारा खर्च व मेंन्टेनन्स चार्ज देण्यात येऊन दुकान चालविण्यास देण्यात यावे तसेच याबाबत वैद्यकीय संचालक यांनी अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांचेशी विहित पध्दतीने याबाबत करारनामा करुन घेण्यात यावा, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. "

त्यानुसार मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांना इकडील पत्र क्र. ४८९० दि. १८/०३/२०१० अन्वये कार्याआदेश देऊन सदर कामी आदेशात सदरचे दुकान चालवणेकामी अट क्र. १३ अन्वये खालील बाबींवरील खर्च वजा जाता होणा-या नफ्याची रक्कम संस्थानला जमा करणेबाबत ठरलेले होते.

| Sr. No. | Details of operating charges |
|---|---|
| 1 | Salary & Wages |
| 2 | Staff Welfare – Non - Statutory |
| 3 | Computer Stationery |
| 4 | Packing Material |
| 5 | Insurance |
| 6 | Outsource Charges |
| 7 | Audit fee |
| 8 | Postage & Stamp |
| 9 | Miscellaneous Expenses |
| 10 | Freight Outward |
| 11 | Conveyance |
| 12 | Telephone & Net Connection |
| 13 | Electricity Charges |
| 14 | Repairs & Maintenance (M) |
| 15 | Office Maintenance (M) |
| 16 | Interest on Inventory |

सदर अटीमध्ये जर दरमहा नफा खर्च वजा जाता रु. २७५०००/- पेक्षा कमी झाला तर त्यांना कमीत – कमी रु.७५०००/- देणे बंधनकारक राहील असे ठरले होते. त्यानुसार दुकान कार्यान्वित झाल्यापासून रु. २७५०००/- पेक्षा जास्त नफा झालेला आहे. व तो त्यांनी संस्थानमध्ये वेळोवेळी जमा केलेला आहे. (रक्कम रु. ४९६७७९४०/-)

सदर दुकान चालविणेकामी लागणारा परवाना मिळणेबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या नियमानुसार कमीत– कमी ५ वर्षाचा भाडे करार आवश्यक असतो. त्यानुसार त्यांना ५ वर्षाकरिता भाडे तत्वावर औषध दुकान चालविण्यास देण्यात आलेले आहे. करार नाम्यानुसार त्यांनी दुकान दि. ०१/०४/२०१० पासून कार्यान्वित करणेबाबत ठरलेले होते. परंतु, प्रत्यक्षात दि. ०९/०५/२०१० पासून सदरदुकान कार्यान्वित झालेले आहे.

संस्थानकडून इकडील पत्र क्र. १२८६६ दि. ०१/०९/२००८ अन्वये शासनाकडे ५ वर्षाकरिता भाडे तत्वावर औषध दुकान चालविण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर दि. २७/०१/२०१० रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सदर औषध दुकान भाडे तत्वावर चालविण्यास मान्यता मिळालेली होती तसेच महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. सासंवि/२००९/१९६/प्र.क्र.१०/का.१६ दि. १३/११/२०१३ चे पत्रान्वये मान्यतेबाबत खालील प्रमाणे आदेश प्राप्त झालेला आहे.

"याबाबत आपणांस असे कळविण्याचे मला निर्देश आहेत की, श्री साईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर देण्यात आलेल्या औषध दुकानाचा करार संपुष्टात आल्यानंतर पुन्हा करारास मुदतवाढ न देता संस्थानमार्फत औषध दुकान चालविण्याच्या पर्यायाचा विचार करण्यात यावा किंवा संस्थानमार्फत औषध दुकान चालविणे शक्य नसल्या दुकान भाडेतत्वावर चालविण्यास देताना जाहिर निविदा प्रक्रिया राबवून जास्तीत – जास्त दराने दुकान भाडेतत्वावर देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. "

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात चालविण्यात येत असलेल्या नियम व अटीनुसार श्री साईनाथ रुग्णालयात देखील सदर दुकानाचे विस्तारीत कक्ष (Extension counter) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/१२/२०१० निर्णय क्र. ९५८ अन्वये चालविण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील पत्र क्र. ५६८६ दि. २३/१२/२०१० अन्वये दि. ०१/०१/२०११ पासून पुढील ५ वर्षाकरिता दुकान चालविण्यास देण्यात आलेले होते. परंतु, प्रत्यक्षात दि. ०१/१२/२०११ पासून कार्यान्वित झालेले आहे. सदर दुकानाचा कालावधी देखील करारनाम्यानुसार दि. ३१/१२/२०१५ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे दोन्ही ही रुग्णालयातील दुकानांसाठी सारखीच प्रक्रिया करावी लागणार असल्यामुळे एकाच वेळेस मान्यता व निविदा इत्यादी कार्यवाही करणे योग्य होईल.

यापूर्वी संस्थानतर्फे सदरचे औषध दुकान ३ महिन्यांचे कालावधीसाठी चालवून नंतर ते बंद करण्यात आले होते, कारण औषध दुकानातून जी औषधे विक्री केली जातील त्यांचे छापील बिले रुग्णांना देणे बंधनकारक आहे व त्यावर संस्थानचा Sale Tax No. टाकणे अनिवार्य आहे. परंतु, संस्थान ही धर्मदाय संस्था असल्यामुळे संस्थानचे नावाने Sale Tax No. घेतला तर संस्थानमार्फत जेथे जेथे साहित्य विक्री करण्यात येते त्या सर्वावर संस्थानला विक्रीकर भरावा लागेल. त्यामुळे सदरचे दुकान बंद करण्यात आले होते. त्यामुळे संस्थानतर्फे औषध दुकान तांत्रिकदृष्ट्या चालविता येणार नाही. तेंव्हा दोन्ही रुग्णालयाकरिता पुन्हा विहित पध्दतीने ई – निविदा मागवाव्या लागतील. तसेच सदरचा प्रस्ताव दि. १३/०३/२०१५ रोजी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या मान्यतेसाठी सादर केलेला असून सदर प्रस्तावास मान्यता येईपर्यंत मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस्, चेन्नई यांना रुग्णांच्या सोईच्या दृष्टीने त्यांना मुदतवाढ द्यावी लागणार आहे.

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीरततसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७ - २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**<u>स्पष्ट मत/ विभागाचा अभिप्राय:-</u>** संस्थानच्या दोन्ही रुग्णालयाकरिता औषध दुकान चालविणेस संस्थानने मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांना परवानगी दिली होती. तथापि, सदरची मुदत दि. ३१/०३/२०१५ रोजी संपत आहे. रुग्णांच्या सोईच्या दृष्टीने सदर औषध दुकान चालविणेकामी निविदा प्रक्रिया करणेसाठी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर विहित पध्दतीने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नवीन औषध दुकान चालविणेकामीचा आदेश होईपावेतो मे.अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस चेन्नई यांना मागील अटी व शर्तीनुसार मुदत वाढ देण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील औषध दुकान चालविणेच्या मूदतवाढीबाबत प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७** **सन २०१३-१४ मधील (Annual Rate Contract) वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** **अधिनियम २०१४ मधील तरतुद** – १७-२(ण)

**व्यवस्थान समितीचा ठराव क्र.** – मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्र.५६४ Clause No.९ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक** – श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणा-या औषधे, सर्जिकल व कन्झुमेबल साहित्याकरिता सन २०१३-१४ या वर्षाकरिता वार्षीक निविदेतील मंजुर दराने एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु.३०,५२,८८,३५८/- चे दि.१९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे,सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि.१६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ चे निर्णय क्र.५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण ५८ औषधांसाठी एकुण रक्कम रु.१,३८,४७,४१२ चे खर्चास मा. त्रिसदस्य समितीची दि.१२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवण्यासाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालू असतांना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

वार्षीक खरेदीमध्ये औषधे व सार्जिकल साहित्य खरेदीकामी रक्कम रु.४८,६६,६४,२५२/- खरेदीस दि.२६/०७/२०१३ चे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.५६४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि.२५/१०/२०१३ रोजी मान्यता मिळालेली आहे. त्यातील काही औषधेही वार्षीक मागणीपेक्षा कमी लागतातततर काही औषधे जास्त लागतात जी मुळ मागणी पेक्षा जास्त लागतात ती वार्षीक मंजुर दराने (Annual Rate Contract) खरेदीचा प्रस्ताव आहे. रु.३३,६६,६४,२५२/- या मंजुर रक्कमेपेक्षा जास्त रकक्म झालेली नसून सन २०१४-१५ या वर्षाचे मंजुर दराने आता पर्यंत वेगवेगळया औषधांची वेगवेगळया प्रस्तावाअन्वये आता पर्यंत एकुण रक्कम रु.८८३१३३६.७५ ची अतिरिक्त खरेदीदि.११/०३/२०१५ अखेर केलेली आहे. दि.११/०३/२०१५ अखेर रु.३२९१२१४१/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

सन २०१३-१४ या वर्षाच्याऑर्डर हया दि.१९/०३/२०१५ रोजी दिलेल्या आहे. व त्याच ऑर्डरचा माल सध्या येत आहेत त्याची मुदत १ वर्षासाठी म्हणजे मार्च २०१५ पर्यंत आहे. त्यामुळे सन १४-१५ मध्ये टेंडरींग केलेले नाही. सन २०१५-१६ (एप्रिल २०१५ ते मार्च २०१६) चे टेंडर कार्यवाही चालू आहे. हॉस्पिटल दर हे वेगळे असतात व ते रिटेल किंवा होलसेलपेक्षा कमी असतात त्यामुळे ओपन मार्केटपेक्षा टेंडरमधील दर हे कमी असतात व बाहेरुन बाजारभावाने खरेदी करणे ऐवजी मंजुर दराने खरेदी केल्याने त्यामध्ये संस्थानचा फायदा होतो. सन २०१५-१६ या वर्षामध्ये राजीव गांधी योजने अंतर्गत रुग्णांना लागणारे औषधांच्या मागणीचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदरचे औषधे कोणत्या आजारासाठी वापरले जातात या बाबत सोबतच्या मागणीनुसार तक्त्यात नमुद केलेले आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशील तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– अधिनियिमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवला आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयाकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**– रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजनेअंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरिता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीने अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि.१५/०३/२०१४ निर्णय क्र.२५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्याच मंजुर दराने खरेदी करण्यात आलेली असून याकामी पुर्णांकित रक्कम रु.७१,१७,२३१/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.१३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सन २०१३-१४ मधील (Annual Rate Contract) वार्षीक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी साहित्याच्या केलेल्या अतिरिक्त खरेदीची व त्याकामी झालेल्या एकूण रु.७१,१७,२३१/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८** **सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सि.व्ही.टी.एस विभागातील डॉक्टरांनी त्यांना मिळत असलेल्या इन्सेंटीव्हमध्ये वाढ करणेबाबत मागणी केली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुपर स्पेशालिटी वैद्यकिय सेवा देणेबाबत व शिर्डी सारख्या ठिकाणी सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध होऊन टिकुन राहण्यासाठी डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रुग्णांना आकारण्यात येणा-या बिलातील विशिष्ट रक्कम देणेबाबत मा.व्य.स.सभेमध्ये निर्णय संमत झाला आहे. गरीब व गरजु रुग्णांना कमीत कमी दरात हृदयशस्त्रक्रिया वैद्यकिय सेवा देण्यास अनुसरुन इतर रुग्णालयांच्या तुलनेत दर कमी ठेवुन त्याप्रमाणे डॉक्टरांनाही इन्सेंटीव्ह ठरविण्यात आला होता. मे २००६ पासून ते आजपर्यंत बायपास सर्जरीसाठी दर आकारणीमध्ये झालेली व सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ, इन्टेंसिव्हीस्ट डॉक्टर व परफयुजनिस्ट यांना देण्यात येणारा इन्सेंटीव्ह थोडक्यात खालील प्रमाणे

| निर्णय क्रं.५५०/दि.१९.०८.२००६ | | निर्णय क्रं.७७०/दि.२२.०९.२००७ | | निर्णय क्रं.१९६/दि.०८.०३.२००९ | | निर्णय क्रं.८२०/दि.०८.१०.२०१२ (JD & RGJAY) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६५,००० | १४,००० | ७५,००० | १५,००० | ८३,००० | १५,००० | १,२५,००० | १५,००० |

निर्णय क्रं.५५०/दि.१९.०८.२००६ या सुरुवातीपासुन सर्जन डॉक्टर, भुलतज्ञ डॉक्टरांची रक्कम तीच असुन त्यानंतर पुढील ५ वर्षात दर आकारणी रु.६५,०००/- वरुन रु.८३,०००/- व सध्या राजीव गांधी व जीवनदायी योजनेअंतर्गत दर रु.१,२५,०००/- करण्यात येऊन डॉक्टरांना देण्यात येणा-या रकमेत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. डॉक्टरांनी सदर रकमेत वाढ करणेबाबत मागणी केली होती, तथापी प्रत्यक्ष दर अंमलबजावणीचे वेळी विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. यामध्ये अदयाप वाढ करण्यात आलेली नाही. कार्डीयाक सर्जन यांनी सदर बाबत प्राधान्याने विचार करण्यात यावा असे दि.१९.०८.२०१३ रोजीचे पत्रान्वये लेखी विनंती केली आहे. हृदयशस्त्रक्रिया विभागातील शस्त्रक्रियांचे सध्याचे दर व डॉक्टरांची मागणी व वाढीव रक्कम मिळत असलेप्रमाणे साधारणतः प्रस्थावित केलेले दर यांचे विवरण निर्णयार्थ सोबत जोडले आहे. सदर प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे दि.०५.०६.२०१४ रोजी झालेल्या सभेमधील निर्णय क्रं.३४४ अन्वये स्थगित ठेवण्यात आला होता परंतु आपल्या हॉस्पिटलला चांगल्या डॉक्टरांची सेवा सतत पुढे चालु राहण्यासाठी या प्रस्तावावर पुनःश्च विचार होणे आवश्यक असल्याने प्रस्ताव फेर सादर केला आहे. यावर दि.१२.०३.२०१५ रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.९८ प्रमाणे तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. सदर निर्णयाप्रमाणे इतर धर्मदाय रुग्णालयातील माहिती घेऊन सदर विषय पुन्हा सादर करणेचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे आत्मा मालिक रुग्णालय, कोकमठाण व आनंदऋषीजी हॉस्पिटल, अ.नगर यांचेकडुन माहिती संकलित माहिती संकलित केली आहे, परंतु सदर माहिती ही अधिकृत प्राप्त झालेली नाही. तरी यावर निर्णय होणेस्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१३१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेसाठी राजीवगांधी जीवनदायी योजनेकडून अधिकृत तसेच इतर रुग्णालयांकडूनही इंन्सेन्टीव्हबाबतची अधिक माहिती संकलित करणेत यावी. याबाबत अधिक माहिती न मिळाल्यास १५ दिवसाच्या आत सभा आयोजित करणेत येऊन, निर्णय घेतला जाईल, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२९** **कॅथलॅब मधील प्रोसिजर्सवरील यापुर्वी कपात केलेल्या इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करण्यास व फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजिस्ट यांनाही ते दर लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीयालॉजी विभागातील डॉक्टरांना मासिक वेतना व्यतिरीक्त कामाचे विशिष्ट प्रमाणात मोबदला देण्याबाबत वेळोवेळी मा.व्य.स.चे सभेत निर्णय संमत झाले आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणेः-

1. निर्णय क्रं.१९६/दि.०८.०३.२००९ अन्वये लागु असलेल्या इन्सेन्टीव्ह दरास अनुसरुन एकूण दोन कार्डीओलॉजिस्ट यांना प्रत्येकी मासिक वेतना व्यतिरीक्त साधारणतः रु.२० ते २५ लाखापर्यंत इन्सेन्टीव्ह दिला जात होता. सध्या या दोन कार्डीओलॉजिस्ट यांना आर्थिक गैरव्यवहार व कामातील निष्काळजीपणामुळे खातेनिहाय चौकशी करिता सेवा निलंबित करण्यात आले आहे.
2. दरम्यानच्या कालावधीत मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपाठ यांचेकडील सिव्हल ॲप्लीकेशन नं.२७९७/ २०१४ दि.१९.०३.२०१४ अन्वये, सहा महिने कालावधीकरीता कार्डीयालॉजिस्ट नेमणुकीस मान्यता मिळाली होती. त्यास अनुसरुन २ पुर्णवेळ फिक्स मानधनावर व ५ व्हिजीटींग कार्डीयालॉजीस्टचा पॅनल विहीत पध्दतीने नियुक्त करण्यात आला होता. त्यांच्या कामाचा अनुभव पाहुन एक कार्डीओलॉजिस्ट यांना मासिक फिक्स ०३ लाख रुपये व दुस-या कार्डीओलॉजिस्टला मासिक दीड लाख रुपये व इतर व्हिजिटींग कार्डीओलॉजिस्ट यांना खालीलप्रमाणे इन्सेन्टीव्ह मंजुर करण्यात आला होता.

| **पुर्वीचा इन्सेन्टीव्ह दर (रुपये)** | | **नव्याने लागु करण्यात आलेला इन्सेंन्टीव्ह दर (रुपये)** | |
|---|---|---|---|
| ॲन्जीओग्राफि | १,०००/- | ॲन्जीओग्राफि | ३००/- |
| ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता इतर सर्व समकक्ष प्रोसिजर्स् | ८,०००/- व १०,०००/- | ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता | ३,०००/- |
| २ डी इको, टीएमटी, | १८०/- | २ डी इको, टीएमटी, | १८०/- |

डॉक्टर मनोहर शिंदे यांना सर्व प्रकारच्या प्रोसिजर्स्ची चांगल्या प्रकारे माहिती व अनुभव असल्याने त्यांनी दर महा तीन ऐवजी ४ लाखाची मागणी केली होती. तथापी, कामाचा अभिप्राय पाहुण वाढ करणेबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगीतले होते.

3. सहा महिने कालावधीकरीता नेमणुका केल्या नंतर कॅथलॅब विभागाच्या कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा ः:- इन्सेन्टीव्ह दर कमी झाल्याने मासिक साधारणतः रु.४० ते ४५ लाखावरुन इन्सेन्टीव्ह रु.१५ ते २० लाखापर्यंत आला म्हणजे साधारणतः रु.२० ते २५ लाखापर्यंत मासिक आर्थिक बोजा कमी झाला. इन्सेन्टीव्ह दर कमी झाल्याने व्हिजीटींग एकुण ०५ डॉक्टरांच्या पॅनेल पैकी दोन डॉक्टर दोन ते तीन महिन्यात व्हिजीट देण्याचे बंद झाले. उर्वरीत डॉक्टरांनीही इन्सेन्टीव्ह वाढीची मागणी केली आहे.

तथापी, सहा महिने कालावधी पुर्ण झाल्यानंतर आपल्या मागणीचा विचार केला जाईल असे त्यांना वेळोवेळी सांगण्यात येऊन पुर्वीच्या दोन कार्डीओलॉजीस्ट यांच्या सेवा निलंबनाच्या कालावधीत रुग्णाची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत त्यांना सांगण्यात आले होते.

4. मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ दि.१२.०१.२०१५ अन्वये, या कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांना पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे व त्यास अनुसरुन त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. तथापी, या डॉक्टरांची मागणीप्रमाणे इन्सेन्टीव्ह वाढ झालेली नसल्याने सदर कार्डीओलॉजीस्ट डॉक्टर सोडुन जाण्याची शक्याता निर्माण झाली आहे. पैकी व्हिजीटींग डॉक्टरांनी लेखी मागणी केली आहे तर मासिक फिक्स मानधनावरील कार्डीओलॉजीस्ट डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांनी दि.०४.०२.२०१५ रोजी एक महिना नोटीस कालावधी नमुद करुन राजीनामा पत्रे दिली आहे.

5. व्हिजीटींग डॉक्टर नाशिक, औरंगाबाद येथुन व्हिजीट देण्यासाठी येत असतात, त्यांना किमान व्हिजीटची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने त्यांनी इन्सेन्टीव्हमध्ये मोठया प्रमाणावर वाढ करण्याची मागणी केली आहे. तर पुर्णवेळ कार्डीयालॉजीस्ट यांनीही इन्सेन्टीव्हमध्ये वाढ होऊन मासिक फिक्स मानधनाऐवजी इतर डॉक्टरांप्रमाणे केलेल्या कामाच्या विशीष्ट प्रमाणात इन्सेन्टीव्हची मागणी केली आहे.

कॅथलॅब विभागाच्या कामाचा आढावा घेतला असता रुग्णाची संख्या दिवसे दिवस वाढत आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे, त्यास अनुसरुन कार्डीयालॉजीस्ट डॉक्टर यांची आवश्यकता टाळता येणार नाही. तथापी, कार्डीयालॉजीस्ट यांना इतरत्र ठिकाणी मिळत असलेल्या इन्सेन्टीव्हच्या प्रमाणात आपल्या रुग्णालयामध्ये सध्याच्या इन्सेन्टीव्ह दरामध्ये काही प्रमाणात वाढ करणे व्यवहार्य वाटते. त्यास अनुसरुन पुर्वीचे इन्सेन्टीव्ह दर व प्रस्तावीत केलेले दर आपले अवलोकनार्थ खालील प्रमाणे सादर केले आहेतः-

| **कॅथलॅब प्रोसिजर्स** | **मा.व्य.स. निर्णय क्रमांक १९६ दि.०८.०३.२००९ पुर्वीचा दर रु.** | **मा.व्य.स. निर्णय क्रमांक ३४३ दि.०५.०६.२०१४ सध्याचा दर रु.** | **डॉक्टरांची मागणी रु.** | **प्रस्तावीत दर (रु.)** |
|---|---|---|---|---|
| ॲन्जीओग्राफी | १,०००/- | ३००/- | १,५००/- | **१,०००/-** |
| ॲन्जीओप्लास्टी १ व २ स्टेन्ट करीता | ८,०००/- (Single Stent) व १०,०००/- (Double Stent) | ३,०००/- (Single & Double) | ८,०००/- (Single Stent) व १०,०००/- (Double Stent) | **८,०००/- (Single Stent) व १०,०००/- (Double Stent)** |
| २ डी इको, टीएमटी | १८०/- | १८०/- | ४२०/- | **२५०/-** |
| TEE Test | १८०/- | १८०/- | ७००/- | **५००/-** |
| BMV, BPV/BAV, POBA,COA Dilation, PDA Coil Closure | ७,५००/- | ३,०००/- | ७,५००/- | **७,५००/-** |
| ASD, VSD, PDA, Device Closure, IVC Filter, | १०,०००/- | ३,०००/- | १०,०००/- | **१०,०००/-** |
| Permanent Pacemaker | ८००० + २००० (सर्जन) | ३००० + २००० (सर्जन) | १०,०००/- (८०००+ २००० सर्जन) | १०,०००/- (सर्जन वापरल्यास पैकी २००० सर्जनसाठी) |

तसेच पुर्णवेळ कार्डीओलॉजिस्ट डॉ.मनोहर शिंदे रुजू झाल्यापासून त्यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये या विभागातील काही नवीन प्रोसिजर्स सुरु केल्या आहेत त्यापैकी काही प्रोसिजर्सचा समावेश राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत असल्याने त्या कराव्या लागतील त्या व्यतिरिक्त काही प्रोसिजर्स आहेत, त्यांचे दर ठरवून त्याही आपल्या हॉस्पिटलमध्ये सुरु करता येतील. थोडक्यात अशा प्रोसिजर्स, राजीव गांधी योजनेनुसार त्यांचे दर व इतर नवीन प्रोसिजर्स यांचे सर्वसाधारण दर व त्यावर डॉक्टरांनी मागणी केलेली इन्सेन्टीव्ह दर खालीलप्रमाणे :-

| **I. राजीव गांधी योजनेत समाविष्ट असलेल्या परंतु नव्याने सुरु करता येणा-या प्रोसिजर्स** | | | | |
|---|---|---|---|---|
| नवीन कॅथलॅब प्रोसिजर्स | मा.व्य.स. निर्णय क्र.१९६ दि.०८.०३.२००९ पुर्वीचा दर रु. | प्रस्तावित दर (राजीव गांधी योजनेतील मंजूर दरपत्रकानुसार) रु. | डॉक्टरांची इन्सेन्टीव्ह मागणी | **प्रस्तावीत दर (रु.)** |
| Aorta Interventions | --- | १,१०,०००/- | १५,०००/- | **१०,०००/-** |
| CoA Stenting | --- | ८०,०००/- | १०,०००/- | **१०,०००/-** |
| Peripheral Interventions | --- | ६०,०००/- | १०,०००/- | **१०,०००/-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Carotid Interventions | --- | १,५०,०००/- | १२,०००/- | **१०,०००/-** |
| EPS+RFABasic Arrythmias | --- | ७०,०००/- | १०,०००/- | **१०,०००/-** |
| EPS+RFA Complex Arrythmias | --- | ९५,०००/- | १२,०००/- | **१२,०००/-** |
| **II. राजीव गांधी योजनेव्यतिरिक्त नवीन प्रोसिजर्स खालीलप्रमाणे** | | | | |
| Pediatric Echo | --- | १,०००/- | ५००/- | **५००/-** |
| Dual chamber PPI/ | --- | ३०,०००/- + Cost of Pace Maker/ Device | १६,०००/- | **१०,०००/-** |
| ICD (Defrilator) | --- | ७०,०००/- + Cost of Pace Maker/ Device | १६,०००/- | **१५,०००/-** |
| BiVPacing | --- | ६०,०००/- + Cost of Pace Maker/ Device | १६,०००/- | **१६,०००/-** |
| Combo Device (Pacing) | --- | ८०,०००/- + Cost of Pace Maker/ Device | १६,०००/- | **१६,०००/-** |
| EPS | --- | ५,५००/- | ३,०००/- | **१,०००/-** |

प्रस्तावित केलेल्या दरानुसार इन्सेन्टीव्ह लागू केल्यास चांगल्या प्रकारे कामाचा अनुभव असलेले, नावलौकीक झालेले असे सध्याचे कार्डीओलॉजिस्ट डॉक्टर्स व त्यांच्या कामाचा आढावा घेता आर्थिक गैरव्यवहार दिसून येत नाही व त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. सदर वाढीव दरांचे अवलोकन होऊन लागु केल्यास कॅथलॅब विभागाचे कामकाज, सुरळीतपणे चालू राहिण्यास मदत होईल, तज्ञ डॉक्टर्स टिकून राहतील व रुग्णांना उत्तम प्रकारे वैद्यकीय सेवा देण्यास मदत होईल.

तरी सध्या कार्यरत असलेल्या कार्डीओलॉजिस्ट डॉक्टरांच्या मागणीस अनुसरुन इन्सेन्टीव दरात काही प्रमाणात वाढ करण्यास व डॉ.मनोहर शिंदे, कार्डीओलॉजिस्ट यांना मासिक फिक्स रुपये तीन लाख मानधनाएवजी वेतनाचे प्रमाणात पण मासिक फिक्स मानधन रु.60,000/- अधिक इतर कार्डीओलॉजिस्ट प्रमाणे केलेल्या कामाचे प्रमाणात इन्सेन्टीव्ह लागू करणे व डॉ.प्रशांत पवार, यांना पुर्णवेळ ऐवजी व्हिजिटींग कार्डीओलॉजिस्ट पॅनलमध्ये समावेश करुन सेवा घेण्यास आणि नव्याने प्रस्तावित केलेल्या प्रोसिजर्स यांचे दर व त्यांचे इन्सेन्टीव्ह दर यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव दि.12/03/2015 रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर केला होता यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.99 प्रमाणे सदरच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता दिलेली आहे. परंतु अशाच प्रकारचे दर इतर धर्मदाय रुग्णालयांमध्ये कशा प्रकारचे आहेत याबाबत माहिती घेऊन सदर प्रस्ताव फेर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन आत्मा मालिक हॉस्पिटल, कोकणठाम व आनंदऋषीजी हॉस्पिटल, अहमदनगर यांचेकडून माहिती संकलित केली आहे, परंतु सदर माहिती ही अधिकृत प्राप्त झालेली नाही. तरी यावर निर्णय होणेस्तव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१३२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या कार्यरत असलेल्या कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांच्या मागणीस अनुसरुन इन्सेन्टीव्ह दरात काही प्रमाणात वाढ करणेसाठी राजीवगांधी जीवनदायी योजनेकडून अधिकृत तसेच इतर रुग्णालयांकडूनही इंन्सेन्टीव्हबाबतची अधिक माहिती संकलित करणेत यावी. याबाबत अधिक माहिती न मिळाल्यास १५ दिवसाच्या आत सभा आयोजित करणेत येऊन, निर्णय घेतला जाईल, असे ठरले.**

**तसेच डॉ.मनोहर शिंदे, कार्डीओलॉजिस्ट यांचेबाबत फेर प्रस्ताव सादर करणेत यावा व डॉ.प्रशांत पवार, यांचा पुर्ण वेळ ऐवजी व्हिजीटींग कार्डीयालॉजीस्ट पॅनलमध्ये समावेश करणेत येऊन, त्यांची सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३०** **११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आलेल्या परिचारक/ परिचारीका यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्यीय समितीचे दि २३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३३७ नुसार दि. ११/०६/२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये खालील परिचारक/ परिचारीका यांना वेळोवेळी पुढील ११ महिन्याचे कालावधीसाठी नेमणूक आदेश देण्यात आलेले आहे. सध्या कार्यरत असलेल्या खालील परिचारक/ परिचारीका यांची ११ महिने कालावधीची तात्पुरती नेमणूक माहे माचे २०१५ ते माहे सप्टेंबर २०१५ दरम्यान संपुष्टात येत आहे.

| अ नं | नाव | नेमणूक आदेश व दिनांक | हजर तारीख | ११ महिने मुदत संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | श्री विशल निळकंठ कुलकर्णी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४० /२०१४ दि. २५/०६/२०१४ | ०७/०४/२०१४ | ०६/०३/२०१५ |
| २ | कु मनिषा स्टिफन आवारे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४२ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | ०९/०४/२०१४ | ०८/०३/२०१५ |
| ३ | कु आशुमती संपत सदाफुले | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ | १०/०४/२०१४ | ०९/०३/२०१५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १४३ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | | |
| ४ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४४ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | ११/०४/२०१४ | १०/०३/२०१५ |
| ५ | कु कांचन विनायक शिंदे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४५ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | १२/०४/२०१४ | ११/०३/२०१५ |
| ६ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४६ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | १५/०४/२०१४ | १४/०३/२०१५ |
| ७ | सौ आशा रमेश जगताप | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४७ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | ०८/०५/२०१४ | ०७/०४/२०१५ |
| ८ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४८ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | १०/०५/२०१४ | ०९/०४/२०१५ |
| ९ | श्री राहुल प्रकाश ओहोळ | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १४९ /२०१४ दि. २५/०६/२०१४ | १९/०५/२०१४ | १८/०४/२०१५ |
| १० | कु प्राजक्ता दिपक जाधव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १८२ /२०१४ दि. १२/०७/२०१४ | १२/०७/२०१४ | ११/०६/२०१५ |
| ११ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ १९५ /२०१४ दि. १९/०७/२०१४ | २०/०७/२०१४ | १९/०६/२०१५ |
| १२ | सौ रुथ निलेश श्रीवास्तव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ २१४ /२०१४ दि. ३१/०७/२०१४ | ३१/०७/२०१४ | ३०/०६/२०१५ |
| १३ | कु कविता योसेफ पंडीत | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ २८० /२०१४ दि. २७/०८/२०१४ | ११/१०/२०१४ | १०/०९/२०१५ |

उपरोक्त परिचारक/ परिचारीका यांचेबाबत प्र वैद्यकीय अधिक्षक व प्र वैद्यकीय संचालक यांनी पुढीलप्रमाणे गोपनीय अहवाल दिलेला आहे. सदरचे परिचारक/ परिचारीका यांचे काम समाधानकारक असुन ते हुकुमाप्रमाणे कामे करतात. त्यांचेबाबत काहीही प्रकरण चालू अथवा प्रस्तावीत नाही. त्यांना नियमाप्रमाणे मुदतवाढ देणेस हरकत नाही.

सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांची मुदत उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र ५ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे. मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील पीआयएल नं १२/२०११ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन नं ९४१७/२०१३ बाबत दि ०२/०८/२०१३ रोजीचे आदेशाने मा न्यायालयाने कंत्राटी पध्दतीने परिचारीका / परिचारक नेमण्यास मान्यता दिलेली आहे. प्र वैद्यकीय अधिक्षक व प्र वैद्यकिय संचालक यांचे गोपनीय अहवालानुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयात स्टाफनर्सची आवश्यकता असल्याने सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांना टप्याटप्याने पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल.

तरी, वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त तक्त्यातील अ नं ०१ ते १३ परिचारक/ परिचारीका यांना स्तंभ क्र ५ मध्ये दर्शविलेल्या तारखेनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी शर्तीवर तात्पुरत्या मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ.नं.०१ ते १३ परिचारक/ परिचारीका यांना त्यांचे नावापुढील स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या तारखेनंतर पुढील ११ महिने कालावधीसाठी पुर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१** **व्हिजीटींग पध्दतीने न्युरोसर्जनची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र 3 - सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमुद केले आहे.

तसेच मा मुंबई उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील अ.नं. ६ मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय सस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचा-यांच्या नेमणूका करु नयेत.

त्यानुसार दोन्ही रुग्णालयातील सध्याच्या रिक्त पदांवर व भविष्यात रिक्त होणा’या आवश्यक पदांवर नेमणूका करणेबाबत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेची कार्यवाही चालु आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात न्युरोसर्जनची ०२ पदे मंजूर आहेत. सध्या एक न्युरोसर्जन स्थयी पदावर कार्यरत असुन डॉ काशिनाथ टिंगरे यांना मा त्रिसदस्यीय समिती दि ०३/०८/२०१४ चे सभेतील निर्णयानुसार, जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/१९१७/२०१४ दि. १८/०८/२०१४ अन्वये व्हिजीटींग पध्दतीने ६ महिने कालावधीसाठी नेमणुक देण्यात आलेली आहे. नेमणुकीतील अट क्र ०४ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे. “This is appointment is for a period of 06 months to begin with and is subject to extension after reviewing

your performance at the end of the same.” सदर नेमणुक कालावधी दि. १७/०२/२०१५ रोजी संपुष्टात आलेला आहे.

तथापि रिक्त होणा’या आवश्यक पदांवर नेमणूका करणेबाबत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेची कार्यवाहीस बराचसा कालावधी लागणार आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी येणा-या रुग्णांमध्ये मेंदू व मणक्यांच्या आजाराने पिडीत असलेल्या रुग्णांची संख्या जास्त आहे. तसेच ट्रॉमा युनिटमध्ये न्युरोसर्जन या पदाचे वैद्यकीय अधिका’यांची आवश्यकता असते.

सबब, कामाची तात्पुरती व्यवस्था होणेकामी डॉ काशिनाथ नरसोबा टिंगरे यांना व्हिजीटींग पध्दतीने (कन्सल्टेशन चार्जेस 50% डॉ शेअर) पुर्वीच्याच अटी शर्तीस अधिन राहुन त्यांचा पुर्वीचा नेमणुक कालावधी संपलेपासुन पुढे एक वर्ष किंवा सदर पदावर जाहिरातीद्वारे स्थायी उमेदवाराची नेमणुक होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणुक देता येईल असे वाटते.

**निर्णय क्र.१३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ काशिनाथ नरसोबा टिंगरे, व्हिजीटींग न्युरोसर्जन यांचा नेमणुक कालावधी संपलेपासुन पुढे एक वर्ष अथवा सदर पदावर जाहिरातीद्वारे स्थायी उमेदवाराची नेमणुक होईपर्यंत व्हिजीटींग पध्दतीने (कन्सल्टेशन चार्जेस 50% डॉ शेअर) पुर्वीच्याच अटी शर्तीस अधिन राहुन व्हिजीटींग न्युरोसर्जन या पदावर नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२** **रुग्णालये विभागाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक.**

**प्रस्ताव -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज मा. त्रिसदस्य समितीकडे आहे. अधिनियमातील, कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(2) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकांविषयीची तरतुद पुढीलप्रमाणे आहे. “(समिती) विश्वस्तव्यवस्थेचा जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मदाय आयुक्ताकडे पाठविल.”

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मदाय आयुक्तांकडे पाठविणे आवश्यक आहे. रुग्णालये विभाग-श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यातील जमा-खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:-

**रुग्णालये विभागाचे जमेचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)**

| अ.नं. | तपशिल | सुधारीत अंदाजपत्रक २०१४-१५ | अंदाजपत्रक २०१५-१६ | | मागील तुलनेत वाढ/घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकुण टक्केवारी | रक्कम | वाढ टक्के |
| १ | प्रारंभीची शिल्लक | २०,००,००० | २२,००,००० | - | २,००,००० | - |
| २ | अपेक्षित भांडवली जमा | निरंक | निरंक | - | निरंक | - |
| ३ | अपेक्षित महसुली जमा | ८६,३४,२५,००० | ९६,५५,००,००० | ५१% | १०,२०,७५,००० | १२% |
| ४ | संस्थानकडुन वर्ग (तुट) | ७०,५९,२०,००० | ९२,३५,७०,००० | ४९% | २१,७६,५०,००० | ३१% |
| **एकुण अपेक्षित जमा** | | **१,५७,१३,४५,०००** | **१,८९,१२,७०,०००** | **१००%** | **३१,९९,२५,०००** | **-** |

**रुग्णालये विभागाचे खर्चाचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)**

| अ.नं. | तपशिल | सुधारीत अंदाजपत्रक २०१४-१५ | अंदाजपत्रक २०१५-१६ | | मागील तुलनेत वाढ/घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकुणशी टक्केवारी | रक्कम | वाढ टक्के |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | १६,४७,५०,००० | २२,६८,५०,००० | १२% | ६,२१,००,००० | ३८% |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | ६२,६७,८३,००० | ८२,३९,३५,००० | ४४% | १९,७१,५२,००० | ३१% |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | २४,३७,००० | २२,८५,००० | ०.१२% | -१,५२,०००० | -६% |
| ४ | न्यासाच्या उद्दीष्टां-वरील अपेक्षित खर्च | ७७,५३,७५,००० | ८३,६०,००,००० | ४४% | ६,०६,२५,००० | ८% |
| अपेक्षित खर्च | | १,५६,९३,४५,००० | १,८८,९०,७०,००० | १००% | ३१,९७,२५,००० | - |
| अंतीम शिल्लक | | २०,००,००० | २२,००,००० | - | २,००,००० | - |
| **एकुण अपेक्षित खर्च** | | **१,५७,१३,४५,०००** | **१,८९,१२,७०,०००** | **-** | **३१,९९,२५,०००** | **-** |

**ब)** सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करतांना मा.व्य.समितीचे सभेत वेळोवेळी झालेल्या निर्णयांचा विचार करणेत आला आहे. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे नविन संगणक प्रणाली व हार्डवेअर/सॉफ्टवेअर साठी रक्कम रु. ३ कोटी ५० लाख व सी.सी.टी.व्ही. यंत्रणेसाठी रक्कम रु.२ कोटीची अंदाज पत्रकांमध्ये तरतुद करणेत आलेली आहे.

इतर बाबींसाठी कोणत्याही विभागाने निश्चित तरतुद दर्शविलेली नाही, त्यामुळे उपरोक्त बाबींसाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार शासन मान्यता प्राप्त झालेनंतर सुधारीत अंदाजपत्रकांत तरतुद करता येईल.

तरी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता मिळणेसाठी लेखाशाखेमार्फत मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१३५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालये विभागाच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रकाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र. १३६** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** श्री साईबाबा मंदीर शिर्डी येथील दैनंदिन सुरक्षा व कुंभमेळा कालावधीत शिर्डी येथे येणा-या भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने करावयाचे उपाययोजनेवर चर्चा करणेसाठी आजचे सभेत मा.श्री.लखमी गौतम, पोलिस अधिक्षक, अहमदनगर हे उपस्थित होते. सभेबरोबर त्यांनी या मुद्दयांवर सविस्तर चर्चा केली. संस्थान सुरक्षा रक्षकांना गर्दी हाताळणेसाठी आवश्यक प्रशिक्षण देणेकामी पोलिस विभाग सहकार्य करेल, असे त्यांनी सांगितले. तसेच पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडील जिविशा/ निधी/ ११०९१/ २०१४, दि.२७/११/२०१४ रोजीचे पत्रान्वये त्यांनी संस्थानकडे विविध सुरक्षा साहित्यांची ढोबळमानाने मागणी केलेली होती. कुंभमेळयाचा कालावधी जवळ आलेला असल्यामुळे या साहित्यापैकी अत्यावश्यक साहित्याची वेगळी यादी त्यांनी समितीला सादर केली.

पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी मागणी केलेल्या सुरक्षा साहित्यांमधील संस्थानकडे असलेले साहित्य त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच उर्वरित साहित्याची आवश्यकता पाहून व ते साहित्य कसे, कोठे, किती वापरणार याचा त्यांचेकडून डेमो (माहिती) घेण्यात येऊन, आवश्यक सुरक्षा साहित्य खरेदीसाठी येणा-या खर्चास मान्यता घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयासमोर तातडीने सिव्हील अर्ज सादर करणेत यावा.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**(२)** मा.उच्च न्यायालयामधील सिव्हील अर्ज क्र.४०४३/ २०१४ वर दि.०२ मे २०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाचा आदेश झालेला आहे. यावरुन बाहय वळण रस्त्याची आवश्यकता का व कशी आहे, हे मा.उच्च न्यायालयाला माहित असून या आधारावर याकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठी तातडीने संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**(३)** संस्थानचे श्री साई प्रसादालय व कॅन्टीन विभागाकरिता वार्षिक किराणामाल खरेदी करणेकामी निविदाप्रक्रिया राबविणेत येते. या किराणामालाचे वार्षिक दर घेण्यात यावेत, परंतु फक्त दोन महिने कालावधीसाठी पुरेल एवढयाच किराणामालाचा साठा करणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ अधिक्षक, भांडार विभाग)

---

**(४)** डॉ.हरिष हुकूमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजिस्ट यांची खाते चौकशी करणेकामी चौकशी अधिका-याची नेमणूक करणेसाठी पुढील सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.१०४ ते १३६ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर रात्री ०८.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-**xxx** | स्वाक्षरित/- **xxx** | स्वाक्षरित/- **xxx** |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी